नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५१ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




सोमवार, दि. ०४ मे २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## विजयच्या एन्ट्रीनं कोणाला चिंता?



मुंबई : (स. गांवकरी)

पश्चिम बंगाल इतकंच महत्त्वाचं राज्य आहे तामिळनाडू. इथंही 234 जागांसाठी मतदान पार पडलं आहे. खरंतर, दक्षिणेत राष्ट्रीय पक्षांचं फार अस्तित्व नाही. भाजप, काँग्रेस दोन्ही प्रमुख पक्ष स्थानिक पक्षांच्या मदतीनंच निवडणुका लढत आले आहेक. त्यात स्थानिक पक्षांचाच मोठा वाटा राहिला आहे. आता तामिळनाडूमध्ये द्रमुक आणि अण्णा द्रमुक हे दोन मुख्य पक्ष.. त्यांचीच सरकारं राहिली आहेत. आताही स्टॅलिन यांच्या नेतृत्वात सरकार आहे आणि सलग दुसऱ्यांदा सत्तेत येण्यासाठी स्टॅलिन आणि काँग्रेस आघाडीनं तयारी तर पूर्ण केल्याचं दिसतंय. पण, त्यांच्यासमोर एक नवं आव्हान उभं राहिलंय. त्यामुळेच तामिळनाडूची निवडणूक एकतर्फी वाटत असतानाच एका सुपरस्टारची एन्ट्री होते, आणि निवडणूक चुरशीची होते.

जोसेफ विजय... म्हणजेच थलापती विजय. तामिळनाडूंच्या राजकारण एन्ट्री घेणारा आणखी एक सुपरस्टार. तमिलागा वेत्री कळघम म्हणजे टीव्हीके नावाचा पक्ष स्थापन करत विजयनं गेल्या वर्षभरात तामिळनाडूचा प्रत्येक मतदारसंघ पिंजून काढला. आधीच प्रचंड मोठा फॅन क्लब आणि त्याच्याच जोरावर विजयनं मोठी झेप घेतली. तामिळनाडूच्या काही एक्झिट पोल्समध्ये विजयच्या टीव्हीकेला माय ॲक्सिस इंडियाच्या आकडेवारीनुसार, 234 पैकी 120 जागा दाखवण्यात आल्या आहेत. म्हणजे तामिळनाडूत बहुमत...

तामिळनाडूत एमजीआर, करुणानिधी, जयललिता आणि कमल हसन सारख्या सुपरस्टार्सनी मोठा पडदा गाजवल्यानंतर राजकीय पटलावरही मोठी कामगिरी केली आहे. अभिनेता ते नेता, हा प्रवास करणारा विजय़ काही पहिलाच नव्हता. राज्याचा इतिहास अशा अभिनेत्यांना पाठिंबा देणारा राहिल्यानं कमल हसन सोडून प्रत्येकानं मुख्यमंत्रिपदही भुषवलं आहे. काही एक्झिट पोल्स खरे ठरले तर विजय देखील मुख्यमंत्री बनेल.

विजयसाठी राजकीय एन्ट्री तशी सोपी झाली, पण त्याच्यापुढे एम.के. स्टॅलिन यांचा डीएमके आणि काँग्रेस अशा आघाडीचं आव्हान आहे. डीएमकेनं गेल्या पाच वर्षांत केलेली कामं असोत, की अगदी आता लोकसभेत आलेल्या डिलिमटेशनच्या विधेयकावरुन केलेलं राज्यव्यापी आंदोलनं असो... स्टॅलिन यांनी तामिळनाडूत आपली पकड आणखी मजबूत केल्याचं दिसतंय.

जागावापटात मित्रपक्षांचा सन्मान राखणं असो की आकर्षक योजनांचा पाऊस असो, स्टॅलिन-राहुल जोडीनं सत्तेत पुन्हा बसण्यासाठी सगळी तयारी केली आहे. त्यातच जयललिता यांच्या निधनानंतर आणखी नेतृत्वहीन झालेला अण्णाद्रमुक सारखा पक्ष आहे. त्यामुळेच विजयच्या टीव्हीकेला इथं एक चांगली संधी आहे. पण, पोल ऑफ पोल्स असो की आजच समोर आलेली सट्टाबाजाराची आकडेवारीनुसार तरी एम के स्टॅलिन पुन्हा एकदा सत्ता स्थापन करत आहेत.

हा खेळ आकड्यांचा आहे. मात्र, निकाल अंतिम असेल. त्यात सुपस्टार विजय बॉक्स ऑफिसप्रमाणेच विधानसभेतही धाडकेबाज एन्ट्री मारणार की स्टॅलिनच तामिळनाडूचे सुपरस्टार ठरणार हे अवघ्या काही तासांमध्येच कळेल.

### सट्टेबाजार काय म्हणतो?

तामिळनाडू (एकूण जागा 234)
डीएमके + काँग्रेस - 150
अण्णाद्रमुक+भाजप - 55
टीव्हीके - 8

## महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशन अध्यक्षपदावर मोहोळ बिनविरोध

------ : (स. गांवकरी)



महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या रिक्त असलेल्या अध्यक्षपदावर अखेर केंद्रीय नागरी विमानवाहू राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पुण्याच्या बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात पार पडलेल्या असोसिएशनच्या सर्वसाधारण सभेत हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. अजित पवार यांच्या जाण्यानंतर हे पद काही काळ रिक्त होते. गेल्या वर्षी महाराष्ट्र ऑलिंपिक असोसिएशनच्या निवडणुकांमध्ये मोठे राजकीय नाट्य पाहायला मिळाले होते. त्यावेळी अध्यक्षपदासाठी अजित पवार यांच्या विरोधात मुरलीधर मोहोळ यांनी शड्डू ठोकला होता. मात्र, ऐनवेळी दोन्ही नेत्यांमध्ये तडजोड झाली आणि अजित पवार यांची अध्यक्षपदी तर मुरलीधर मोहोळ यांची उपाध्यक्षपदी वर्णी लागली होती. आता अजित पवारांच्या निधनानंतर मोहोळ यांनी या संघटनेची धुरा आपल्या हाती घेतली आहे. अजित पवार यांच्यानंतर त्यांच्या पत्नी आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांचे नाव अध्यक्षपदासाठी चर्चेत होते. दरम्यान, पक्षातील वरिष्ठ नेत्यांशी संपर्क साधला असता त्यांनी स्पष्ट केले की, ऑलिंपिक असोसिएशनच्या अध्यक्षपदासाठी सुनेत्रा पवार यांची अद्याप नियुक्ती झालेली नाही. त्या नुकत्याच खो-खो असोसिएशनच्या माध्यमातून सदस्य झाल्या असल्याने अध्यक्षपदाचा मार्ग मोकळा झाला आणि मोहोळ यांची निवड निश्चित झाली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (NCP) नेते अजित पवार यांचे 28 जानेवारी 2026 रोजी पुणे जिल्ह्यातील बारामती येथे एका भीषण विमान अपघातात (Plane Crash) दुर्दैवी निधन झाले ते 66 वर्षांचे होते. त्यावेळी अजित पवार मुंबईहून बारामतीला जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचार सभेसाठी जात होते. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्र सरकारने 3 दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केला होता, 29 जानेवारी 2026 रोजी बारामती येथे शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. या अपघातात त्यांच्यासह 5 जणांचा मृत्यू झाला. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणातील एका मोठ्या युगाचा अंत झाला आहे.

## थोडक्यात...

### गुंगीचे औषध देऊन लैंगिक शोषण?

नाशिक (स. गांवकरी) : नाशिक येथील नामांकित आयटी कंपनी 'टीसीएस'मधील महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण आणि बळजबरीने धर्मांतर करण्याच्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणाच्या तपासात आता एक अत्यंत खळबळजनक माहिती समोर आली असून, पीडित तरुणींना 'शीरखुर्मा' सारख्या गोड पदार्थातून गुंगीचे औषध देऊन त्यांचे लैंगिक शोषण केल्याचा दाट संशय तपास यंत्रणांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील मुख्य संशयित आणि अद्याप फरार असलेली आरोपी निदा खान हिचा अटकपूर्व जामीन न्यायालयाने फेटाळून लावला असून, अटकेतील चार आरोपींची रवानगी ५ मे पर्यंत पोलीस कोठडीत करण्यात आली आहे. या प्रकरणात तपास करणाऱ्या विशेष पथकाला (SIT) आता 'ड्रग्ज' आणि मादक पदार्थांचा नवा अँगल मिळाला आहे. प्राथमिक तपासानुसार, आरोपींनी आधी महिला कर्मचाऱ्यांशी मैत्री वाढवली आणि त्यानंतर त्यांना शीरखुर्मा खायला दिला. या पदार्थांमध्ये गुंगी आणणारे आणि कामोत्तेजक पदार्थ मिसळले गेल्याचा संशय आहे. याच अमली पदार्थांच्या प्रभावाखाली महिलांवर अत्याचार करण्यात आले. आता नाशिक पोलीस या दिशेने सखोल तपास करत असून, कोठडीत असलेल्या आरोपींनी यापूर्वी अशा किती महिलांना लक्ष्य केले आहे, याची माहिती घेतली जात आहे.

### शोषणाची मी देखील बळी : विनेश फोगाट

पानिपत (स. गांवकरी) : ऑलिम्पियन विनेश फोगाटने भारतीय कुस्ती महासंघाचे माजी अध्यक्ष बृजभूषण शरण सिंह यांच्यावर पुन्हा एकदा अनेक गंभीर आरोप केले आहेत. सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत विनेश म्हणाली की, गोंडा येथे 'सीनियर ओपन रँकिंग कुस्ती स्पर्धा' होत आहे. आज काही अडचणींमुळे मला हे सांगायचे आहे की, बृजभूषण शरण यांच्याविरोधात तक्रार करणाऱ्या त्या 6 पीडितांमध्ये मी देखील आहे. माझी साक्षही न्यायालयात सुरू आहे. त्याच्या घरी (गोंडा) जाऊन स्पर्धा लढणे माझ्यासाठी कठीण होईल. मला वाटत नाही की मी माझे 100 टक्के देऊ शकेन. एका मुलीसाठी हे खूप कठीण असेल.

### नसरापूर पीडितेच्या वडिलांशी दोनदा संवाद साधला

नसरापूर (स. गांवकरी) : नसरापूर येथील चार वर्षीय चिमुकलीवर झालेल्या पाशवी अत्याचार आणि हत्येच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. नागरिकांचा संताप आणि रोष स्वाभाविक असला, तरी लोकशाहीत न्याय प्रक्रियेला महत्त्व आहे. या प्रकरणातील नराधमाला फाशीची शिक्षाच व्हावी, यासाठी राज्य सरकार कायद्यातील कोणतीही पळवाट (लूपहोल) न ठेवता हा खटला 'फास्ट ट्रॅक'वर चालवणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. तसेच, जलदगतीने न्याय देण्याबाबत राज्य शासनाच्या वतीने पीडितेच्या कुटुंबाला लेखी पत्र देण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. तसेच काही लोक शनिवारी रात्री झालेल्या आंदोलनाचा फायदा घेऊन याला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न करत होते, असा दावाही देवेंद्र फडणवीस यांनी केला. नसरापूर अत्याचार आणि हत्या प्रकरणातील पीडित चिमुकलीला न्याय मिळवून देण्यासाठी शनिवारी रात्री पुण्याच्या नवले पुलावर जनआक्रोशाचा उद्रेक झाला. संतप्त ग्रामस्थ आणि नातेवाईकांनी पीडितेचा मृतदेह रस्त्यावर ठेवून महामार्ग रोखून धरल्याने सुमारे चार तास वाहतूक ठप्प होती. अखेर पोलिसांनी बळाचा वापर करत आंदोलकांना पांगवले.

## अत्याचार केला, नंतर मुलीचे फोटो अन् व्हिडीओ आईला पाठवले

अमरावती : (स. गांवकरी)

जिल्ह्यातील वरूडच्या बेनोडामध्ये परतवाड्यासारखा प्रकार घडल्याचं समोर आलं आहे. 22 वर्षीय आरोपीनं एका मुलीवर अत्याचार केला. नंतर वाद झाल्यानंतर त्या मुलीचे अश्लील फोटो, व्हिडीओ काढून तिच्या आई आणि आजीला पाठवल्याची घटना घडली. बेनोडे पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. बाबू हसन असं आरोपीचं नाव असून तो मूळचा उत्तर प्रदेशातील मुरादाबादचा रहिवासी असल्याची माहिती आहे. पीडित मुलगी आणि आरोपीची दोन वर्षांपूर्वी इन्स्टाग्रामवर ओळख झाली होती. दरम्यान पिडीतने स्वतःचे काही फोटो आरोपी यास पाठविले होते. 5 जानेवारीला आरोपी नागपुरात मुलीला भेटण्यासाठी आला. तेव्हा मुलीची इच्छा नसताना आरोपीनं तिच्यावर अत्याचार केला.

काही दिवसानंतर पीडित मुलगी आणि आरोपीमध्ये वाद झाला आणि पीडितेनं आरोपीचा नंबर ब्लॉक केला. याच रागातून आरोपीनं त्या मुलीचे अश्लील फोटो आणि व्हिडीओ तिच्या आई आणि आजीला पाठवले. तसेच ते फोटो आणि व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकीही दिली.

घडलेल्या प्रकारानंतर आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यता आला. नंतर पोलिसांनी कारवाई करत आरोपीला अटक केली. सध्या आरोपीची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. आरोपीकडून दोन मोबाईल फोन तसेच पीडितेच्या आजीचा एक मोबाईल फोन गुन्ह्यात जप्त करण्यात आला आहे. त्यामध्ये पीडित मुलीचा फोटो तसेच आरोपी तिचा मुका घेत असलेला फोटो मिळाला आहे. या व्यतिरिक्त इतर कोणतेही आक्षेपार्ह फोटो किंवा व्हीडीओ मिळालेले नाहीत. तरीही सर्व मोबाईल न्यायवैज्ञानिक प्रयोगशाळेकडून तपासणी करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

## जन्मदात्या बापाकडूनच गतीमंद मुलीवर वारंवार अत्याचार

### मुलगी गर्भवती, लातूर हादरलं

लातूर : (स. गांवकरी)

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून धक्कादायक आणि संतापजनक घटनांची मालिका सुरु आहे. नसरापूर आणि बीडनंतर आता लातूर जिल्ह्यातील जळकोट तालुक्यातून अत्यंत अमानवी प्रकार उघडकीस आला आहे. बाल लेकीच्या नात्याला काळीमा फासणारी घटना समोर आली आहे. जन्मदात्या पित्यानेच आपल्या अल्पवयीन गतिमंद मुलीवर वारंवार अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

या प्रकरणात पीडित मुलीच्या आईने 17 एप्रिल रोजी जळकोट पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. अज्ञात व्यक्तीकडून मुलीवर अत्याचार झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता. दरम्यान, पीडित मुलगी सुमारे 19 आठवडे 2 दिवसांची गर्भवती असल्याचे समोर आले होते, त्यामुळे प्रकरणाचे गांभीर्य अधिक वाढले. तक्रारीनंतर जळकोट पोलिसांनी सखोल तपास सुरू केला. तपासादरम्यान संशयाच्या आधारे मुलीच्या वडिलांना ताब्यात घेऊन चौकशी करण्यात आली. पोलिसी चौकशीत संबंधित आरोपी वडिलांनीच हे कृत्य केल्याची कबुली दिल्याची माहिती समोर आली आहे.

या प्रकरणी जळकोट पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक 99/2026 नोंद करण्यात आला असून भारतीय न्याय संहिता 2023 मधील संबंधित कलमे तसेच बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (POCSO) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास पोलीस अधिकारी करत आहेत. पुण्यातील नसरापूर येथे 1 मे रोजी एक धक्कादायक घटना घडली. एका 65 वर्षीय व्यक्तीने, घरासमोर खेळणाऱ्या




चिमुकलीला गोठ्यात नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. नंतर दगडाने ठेचून तिला निर्घृणपणे संपवलं आणि नंतर तिचा मृतदेह शेणाच्या ढिगाऱ्याखाली झाकून ठेवला. दुपारी चिमुकली न दिसल्यानं तीची शोधाशोध केल्यानंतर चिमुकली गोठ्यात मृत अवस्थेत आढळली. त्यानंतर परिसरातले सीसीटीव्ही फुटेज चेक केल्यानंतर आरोपी चिमुकलीला गोठ्याच्या दिशेने घेऊन जाताना दिसला. त्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. नराधम आरोपीने वासरू दाखवतो म्हणून हात धरून त्या चिमुकलीला गोठ्यात नेलं आणि तिच्यावर अत्याचार केला.

आजीकडे उन्हाळ्याच्या सुट्टीसाठी आलेल्या या मुलीच्या कुटुंबीयांनी आपल्याच मुली सोबत असं कधी घडेल असा विचारही केला नव्हता. मात्र दुपारी साडेतीन वाजताचे ते सीसीटीव्ही फुटेज समोर आलं आणि अख्खं कुटुंब हादरलं. या घटनेनंतर गावकऱ्यांनी संताप व्यक्त करत पोलिसांना घेराव घातला.

## नसरापूर : आरोपीचा न्यायालयात निर्लज्जपणा

### बचावासाठी किरकोळ भांडणातून गोवल्याचा बनाव; ७ मे पर्यंत पोलिस कोठडी



पुणे : (स. गांवकरी)

भोर तालुक्यातील नसरापूर येथील चार वर्षांच्या चिमुकलीवर पाशवी अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या नराधम आरोपीला पुणे न्यायालयाने ७ मे पर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे. विशेष न्यायाधीश एम. जी. चव्हाण यांच्यासमोर ही सुनावणी पार पडली. सुनावणी दरम्यान आरोपीने स्वतःचा बचाव करण्यासाठी 'भांडणातून गोवल्याचा' धक्कादायक बनाव रचला, मात्र पोलिसांनी सादर केलेले प्राथमिक पुरावे आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेता न्यायालयाने हा दावा फेटाळून लावत त्याला पोलिस कोठडीत पाठवले आहे.

पोलिसांनी आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर न्यायाधीशांनी त्याला "काही तक्रार आहे का?" अशी विचारणा केली. त्यावर आरोपीने अत्यंत निर्लज्जपणे उत्तर देत म्हटले की, "किरकोळ भांडणातून मला या प्रकरणात विनाकारण गोवण्यात आले आहे." आपल्या कृत्याचा कोणताही पश्चात्ताप त्याच्या चेहऱ्यावर दिसत नव्हता. मात्र, तपासातील निष्पन्न तथ्ये आणि चिमुकलीचा मृतदेह ज्या अवस्थेत सापडला, त्यावरून त्याचा हा बनाव न्यायालयात टिकू शकला नाही.

तपास अधिकारी विजयमाला पवार आणि विशेष सरकारी वकील अरुंधती ब्रह्मे यांनी आरोपीच्या जास्तीत जास्त पोलिस कोठडीची मागणी करताना अनेक महत्त्वाचे मुद्दे न्यायालयासमोर मांडले. आरोपीने चिमुकलीवर अत्याचार केल्याचे सिद्ध करण्यासाठी त्याची वैद्यकीय आणि रासायनिक विश्लेषण तपासणी करणे आवश्यक आहे. आरोपीची शारीरिक क्षमता तपासणे तपासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.आरोपीने यापूर्वी अशा प्रकारचे कृत्य केले आहे का किंवा पीडितेवर याआधीही अत्याचार झाले होते का, याचा शोध घ्यायचा आहे. ज्या शस्त्राने चिमुकलीची निर्घृण हत्या केली, ते शस्त्र अद्याप जप्त करायचे आहे. या गुन्ह्यात आरोपीला इतर कोणी मदत केली आहे का किंवा यामध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे.

#### जकीय नेत्याने आमच्या घरी येऊ नये

नसरापूर येथील माणुसकीला काळीमा फासणाऱ्या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. विविध राजकीय पक्षांचे नेते आणि पदाधिकारी पीडित कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी नसरापूरला धाव घेत आहेत. मात्र, "जोपर्यंत माझ्या चिमुकलीला न्याय मिळत नाही आणि त्या नराधमाला फाशी होत नाही, तोपर्यंत कोणत्याही राजकीय नेत्याने आमच्या घरी येऊ नये," असे कळकळीचे आवाहन पीडितेच्या वडिलांनी केले आहे. देहू येथे लेकीच्या आस्थी विसर्जनासाठी गेले असताना त्यांनी एका व्हिडिओच्या माध्यमातून आपली ही भूमिका स्पष्ट केली आहे.

## सेवानिवृत्त पोलीस निरीक्षकाच्या घरातून १७ लाखांचा ऐवज लंपास

वाशिम : (स. गांवकरी)

■ दुसऱ्या ठिकाणी चोरट्याला महिलांनी दिला चोप, वाशिमध्ये चोरीच्या दोन घटना

आज वाशिम जिल्ह्यात चोरीच्या दोन घटना समोर आल्या आहेत. एका घटनेत चोरट्यांनी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षकाच्या घरातून 17 लाख 30 हजारांचा ऐवज लंपास केला आहे. तर दुसऱ्या घटनेत गर्दीचा फायदा घेत एका चोरट्याने बसमध्ये चढत असताना लहान मुलाच्या हातातील कडे चोरण्याचा प्रयत्न केला. पण महिलांच्या लक्षात येताच तिथेच दोन महिलांनी चोरट्याला चोप दिला आहे.

वाशिमच्या कारंजा शहरात धाडसी चोरीची घटना समोर आली आहे. मेमन कॉलनी परिसरात अज्ञात चोरट्यांनी सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक जमील रहीम शेख यांच्या घरावर डल्ला मारत तब्बल 17 लाख 30 हजार रुपयांचा ऐवज लंपास केलाय.. चोरट्यांनी घराची कडी तोडून आत प्रवेश करत कपाटातील लॉकर फोडले आणि सोन्याचे दागिने तसेच रोख रक्कम चोरुन नेली आहे. घरातील सदस्य शेजारच्या खोलीत झोपेत असतानाच ही चोरी झाली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच कारंजा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. श्वान पथक आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांच्या मदतीने तपास सुरू असून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली जात आहे. पोलिसांनी आरोपींचा शोध घेण्यासाठी विशेष पथके तैनात केली आहेत. सध्या लग्नसराई आणि सुट्ट्यांमुळे बस स्थानकावर मोठ्या प्रमाणात गर्दी आहे. याच गर्दीचा फायदा घेत एका चोरट्याने बसमध्ये चढत असताना लहान मुलाच्या हातातील कडे चोरण्याचा प्रयत्न करत होता.

ही घटना महिलांच्या लक्षात येताच तिथेच दोन महिलांनी चोरट्याला चोप दिला. हा सर्व प्रकार वाशिमच्या मंगरुळपीर बस स्थानकावर घडला आहे. महिलांनी चोरट्याला झोप देताच नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. दरम्यान नागरिकांनी तात्काळ चोरट्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. गर्दीच्या वेळेस बस स्थानकावर पोलीस असणे गरजेचे असते. मात्र, यावेळी कोणताही पोलीस कर्मचारी बस स्थानकावर हजर नसल्यामुळे संताप व्यक्त होत आहे.

# लहान हातांनी लावली आशेची रोपे

## पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांचे मार्गदर्शन!



अकोले : (स. गांवकरी)

श्री कृष्णचंद्र वारकरी शिक्षण संस्था, धामणगाव पाट (ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांच्या वतीने आयोजित आध्यात्मिक व्यक्तिमत्व विकास व भव्य वारकरी संस्कार शिबिरात विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. हे शिबिर केवळ धार्मिक वा सांस्कृतिक कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा अर्थपूर्ण उपक्रम ठरत आहे. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात शिस्त, भक्तीभाव, सकारात्मक विचार आणि सुसंस्कारांची बीजे रुजवली जात आहेत. संतविचारांनी प्रेरित होत असलेली ही पिढी ज्ञानसमृद्धीसोबतच मूल्यसमृद्धही बनत असल्याचे समाधानकारक चित्र दिसून आले.

शिबिरानिमित्त आयोजित वृक्षारोपण उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. लहानग्या हातांनी मातीमध्ये रोपे लावताना त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा आनंद, निरागसता आणि डोळ्यांतील चमक पाहून उपस्थित भावूक झाले. ही रोपे म्हणजे भविष्यातील हिरव्या, सुंदर आणि सुरक्षित पृथ्वीची आशा असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी वृक्षारोपण हा सर्वात प्रभावी मार्ग असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

प्रत्येकाने वाढदिवशी केक कापण्याऐवजी एक झाड लावावे तसेच पशु-पक्ष्यांसाठी पाण्याची व्यवस्था करावी, असे समाजप्रबोधनपर आवाहनही करण्यात आले.

या प्रसंगी श्री. कैलास राऊत, श्री. मच्छिंद्र राऊत, सोमनाथ महाराज भोर तसेच शिबिरार्थी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम १००८ महामंडलेश्वर बाळासाहेब कोंडार महाराज यांच्या पवित्र आशीर्वादाने संपन्न झाला.

यावेळी पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले, “लहान मुले संस्कारांनी घडली तरच भविष्यातील पिढी आणि पर्यावरण उज्ज्वल राहील.” कार्यक्रमाच्या शेवटी सोमनाथ महाराज भोर यांनी उपस्थितांचे आभार मानून अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडत असल्याचा विश्वास व्यक्त केला.

या उपक्रमातून एक महत्त्वपूर्ण संदेश अधोरेखित झाला — “संस्कार आणि पर्यावरण यांचा अतूट संबंध आहे; आजची संस्कारित पिढीच उद्याची हिरवी, सुंदर आणि सुरक्षित पृथ्वी घडवेल.” पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या पार पडला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### समर्थ गुरुकुलमध्ये समर कॅम्प उत्साहात संपन्न

बेल्हे (स. गांवकरी) : समर्थ रुरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ गुरुकुल, बेल्हे येथे विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेला समर कॅम्प उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरीत्या संपन्न झाला, अशी माहिती समर्थ गुरुकुलचे प्राचार्य सतीश कुऱ्हे यांनी दिली. या समर कॅम्पमध्ये विद्यार्थ्यांनी विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक आणि सर्जनशील उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कॅम्पदरम्यान विद्यार्थ्यांसाठी योगा, चित्रकला, हस्तकला, संगीत, फनी गेम्स, झांज पथक, लाठी-काठी चालवणे, नृत्य, व्यक्तिमत्व विकास, वक्तृत्व कला तसेच विविध मैदानी खेळांचे आयोजन करण्यात आले होते. या उन्हाळी वर्गासाठी क्रीडा संचालक हरिश्चंद्र नरसुडे व पर्यवेक्षक सखाराम मातेले यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रामचंद्र मते यांच्या नियोजनाप्रमाणे क्रीडा शिक्षक विनायक वऱ्हाडी व सुरेश काकडे यांनी उत्कृष्टपणे जबाबदारी पार पाडली. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळाला तसेच आत्मविश्वास, शिस्त आणि टीमवर्कची भावना विकसित झाली. विद्यार्थ्यांनी समर कॅम्पमधील प्रत्येक उपक्रमाचा मनापासून आनंद घेतला. पालकांनीही या उपक्रमाचे कौतुक करत समर्थ गुरुकुलच्या नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांचे स्वागत केले. समारोप कार्यक्रमावेळी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके, उपाध्यक्ष माऊली शेळके, सचिव विवेक शेळके, विश्वस्त वल्लभ शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके, कॅम्पस डायरेक्टर प्रा. राजीव सावंत तसेच प्रशासकीय अधिकारी प्रा. प्रदीप गाडेकर उपस्थित होते.



### शासनाच्या स्व- जनगणना २०२७ ला महाराष्ट्र दिनी प्रारंभ

राजगुरुनगर (स. गांवकरी) : शासनाच्या स्व- जनगणना २०२७ ला महाराष्ट्र दिनी १ मे पासून राज्यात प्रारंभ झाला असून,आपल्या मोबाईल द्वारे कुटुंबाची अचूक माहिती संकलित करण्यासाठी सर्व नागरिकांनी जनगणना करणे अपेक्षित असल्याचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी आवाहन केले आहे. महाराष्ट्र दिन निमित्त राजगुरुनगर येथील तहसीलदार कचेरीच्या प्रांगणात शासकीय ध्वजारोहण आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते संपन्न झाला.यावेळी उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे,तहसीलदार प्रशांत बेंडसे,पोलिस निरीक्षक सुभाष चव्हाण, पंचायत समितीचे सभापती विद्याताई मोहिते,उपसभापती मंगेश सावंत,जिल्हा परिषद सदस्य गणेश बोत्रे,महसूल नायब तहसिलदार राम बीजे,निवासी नायब तहसिलदार चेतन मोरे,पुरवठा निरीक्षक महादेव कुंभार,नायब तहसिलदार मनिषा खैरे,महसूल अधिकारी नीलेश घोडके, जेष्ठ पत्रकार कोंडीभाऊ पाचारणे,पत्रकार रामचंद्र सोनवणे,पत्रकार अमित टाकळकर,पत्रकार नाजीम इनामदार,तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी स्व- जनगणना बद्दल माहिती देताना सांगितले की मोबाईल लिंक द्वारे कुटुंबाची विविध ६४ माहिती संकलित केली जाणार असून यामुळे राज्यातील लोकसंख्या,कुटुंबाचे उत्पन्न साधन व इतर बाबी यामध्ये स्पष्ट होणार आहे. कुटुंबाचे विवरण दिल्यानंतर एक आयडी क्रमांक आपल्याला मिळेल .जे आपल्या घरी येणारे प्रगणक यांना जनगणना साठी उपयोगी राहणार आहे. यावेळी आमदार बाबाजी काळे यांनी खेड आळंदी मतदार संघातील नागरिकांना महाराष्ट्र दिनाच्या शुभेच्छा देत ,स्व जनगणना करून घेण्याचे जनतेला आवाहन केले.

### महालक्ष्मी सरस मधून १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट!

- महिलांसाठी प्रत्येक जिल्ह्यात उमेद मॉल सुरू करणार
- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन




मुंबई (स. गांवकरी) : प्रत्येक जिल्ह्यातील महिलेला हक्काच व्यासपीठ देणारे महालक्ष्मी सरस प्रदर्शन आता नव्या रूपात तयार झालं असून, कोणत्याही जागतिक दर्जाच्या प्रदर्शनाची स्पर्धा करण्यासाठी ते सज्ज आहे. या प्रदर्शनात केवळ सजावटीसाठी कंटेनर लावलेले नाहीत तर ते कंटेनर ऑफ इंडिया आहेत, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वात आत्तापर्यंत ५० लाख लखपती दीदी तयार झाल्या आहेत, येणाऱ्या काळात १ कोटी लखपती दीदी तयार करण्याचं उद्दिष्ट आहे, असं वक्तव्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे झालेल्या महालक्ष्मी सरस प्रदर्शनाच्या उद्‌घाटन सोहळ्यात ते बोलत होते. महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६ सोहळ्याचे उद्‌घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते पार पडले. ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे, मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यमंत्री योगेश कदम यांच्या प्रमुख उपस्थितीत व ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मुख्य सचिव एकनाथ डवले (IAS), मुख्य कार्यकारी अधिकारी उमेद निलेश सागर (IAS), मुख्य परिचालन अधिकारी निखिल ओस्वाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करायचं असेल तर, आपल्या देशातील नारीशक्तीच्या शक्तीचा उपयोग देशाच्या विकासाच्या वाटचालीमध्ये करावा लागेल. ज्या क्षणी ही नारीशक्ती मानव संसाधन म्हणून देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये सहभागी होईल त्या क्षणी भारत विकसित होईल. म्हणूनच मोदीजींनी नारीशक्ती सक्षमीकरणाच्या अनेक योजना या ठिकाणी सुरू केल्या. मला आनंद आहे गेला दहा वर्षात महाराष्ट्रामध्ये उमेद, मवीमच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात महिला बचत गटांची चळवळ उभी राहिली. आणि लाखो महिला या चळवळीशी जोडल्या गेल्या. अनेक कुटुंब लाभार्थी झाली. अनेक महिलांनी स्वतःच्या बळावर बचत गटासोबत आपलं कुटुंब ही सक्षम करण्याचं काम केलं. जे मोदीजींना अपेक्षित होतं ते आमच्या महिलांनी करून दाखवलं असंही मुख्यमंत्री म्हणाले.

## "वटवृक्ष तुमची वाट पाहतोय, यशस्वी होऊन परत या"

निमगाव सावा, ता. जुन्नर : (स. गांवकरी)



"विद्यार्थ्यांनो, या प्रांगणातून बाहेर पडताना हा वटवृक्ष परत पुन्हा आपली वाट पाहत आहे. भविष्यामध्ये उज्वल यश संपादन करून परत या वटवृक्षाकडे यावे. प्रमुख पाहुणा म्हणून आपली उपस्थिती दाखवावी," असा प्रेरणादायी संदेश जगद्गुरु कृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांनी दिला. श्री पांडुरंग ग्रामीण विकास प्रतिष्ठान संचलित दिलीप वळसे पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि श्री पांडुरंग कनिष्ठ महाविद्यालयात १ मे रोजी महाराष्ट्र दिन व आंतरराष्ट्रीय कामगार दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात जगद्गुरु कृपांकित डॉ. चेतनानंद महाराज पुणेकर यांच्या शुभहस्ते अखंड महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराज, अण्णाभाऊ साठे आणि गौतम बुद्ध यांच्या प्रतिमापूजनाने झाली. त्यानंतर ध्वजारोहण करण्यात आले.

मनोगत व्यक्त करताना महाराजांनी महाराष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठी बलिदान देणाऱ्या महापुरुषांचे स्मरण केले. "त्यांचे विचार अंगीकारून आपण आपले सदवर्तन करावे आणि संस्थेप्रती आदर ठेवावा," असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

## ६७ कामगारांचा आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते सन्मान

नेवासा : (स. गांवकरी)



नेवासा तहसीलच्या वतीने महाराष्ट्र दिनासह कामगार दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनाच्या निमित्ताने नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील ६७ कामगारांचा सन्मान यावेळी करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य स्थापना दिन,महाराष्ट्र दिन व कामगार दिनाचे औचित्य साधून नेवासा तहसील कचेरी प्रांगणात मुख्य ध्वजारोहण कार्यक्रम नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते पार पडला या प्रसंगी सर्व प्रथम सावधान अवस्थेत राष्ट्रीय गीत "वंदे मातरम" त्या नंतर ध्वजारोहण करत राष्ट्र गीत व महाराष्ट्र गीत सादर करण्यात येऊन देशाच्या तिरंग्यास सलामी देण्यात आली.

यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या परेडचे संचलन करण्यात आले

तहसीलदार डॉ.संजय बिरादार यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत करून प्रास्ताविक केले.यावेळी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या ६७ कामगारांचा फेटा घालून व गुलाबपुष्प देऊन आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्याला प्रगतीपथावर न्यायचे असेल तर त्याची सुरुवात ही गाव तालुक्यापासून झाली पाहिजे आमदार या नात्याने तालुक्याच्या उन्नतीसाठी सर्वांना बरोबर घेऊन तालुक्याला विकासाच्या मार्गावर नेण्याचा आपला प्रयत्न रहाणार असल्याची ग्वाही आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी यावेळी बोलतांना दिली. यावेळी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले,उपनगराध्यक्षा सौ.शालिनीताई सुखदान,परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी सोनाली मात्रे,सहायक गटविकास अधिकारी बाळासाहेब कासार,निवासी नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे,पुरवठा अधिकारी सुदर्शन दुर्योधन,कृषी अधिकारी धनंजय हिरवे, राज्य शासन समाजभूषण पुरस्कार विजेते विजय जगताप सेवानिवृत्त नायब तहसीलदार राजेंद्र गायकवाड,चंद्रकांत कांदे यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. उपस्थित अतिथींसह मान्यवरांचा गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी शिवसेनेचे नेते भाऊसाहेब वाघ,बालेंद्र पोतदार,वकील संघटनेचे अध्यक्ष अँड.संभाजी काळे,अँड.अशोक करडक,सुरेश नळकांडे,भाजप शहराध्यक्ष मनोज पारखे, नगरसेवक प्रवीण सरोदे,जितेंद्र कु-हे,महेश लोखंडे, अंकुश म्हस्के,डॉ.राहुल चव्हाण,निरंजन डहाळे, जालिंदर गवळी, कृष्णा परदेशी, दिनेश व्यवहारे,संदीप सरकाळे, शिक्षण विभागाचे समी शेख यांच्यासह नगरसेवक,सर्व महसूल विभागाचे अधिकारी व कर्मचारी विविध पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.पत्रकार सुधीर चव्हाण यांनी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर अप्पर तहसीलदार सोनाली मात्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## राष्ट्र पुरुषांना अभिवादन करत महाराष्ट्र दिन साजरा

नेवासा : (स. गांवकरी)



नेवासा नगरपंचायतमध्ये महाराष्ट्रासाठी योगदान देणाऱ्या राष्ट्र पुरुषांना अभिवादन व कामगारांचा सन्मान करत महाराष्ट्र दिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले पाटील यांच्या हस्ते सर्व नगरसेवक, अधिकारी कर्मचारी व नागरीकांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज व बुद्ध जयंती निमित्ताने भगवान गौतम बुद्धांच्या प्रतिमेचे पूजन यावेळी करण्यात आले.

नेवासा नगरपंचायतमध्ये महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त महाराष्ट्र दिन साजरा करत असताना महाराष्ट्राची समृद्ध परंपरा जपणे,ज्या ज्या महानुभावांनी महाराष्ट्रासाठी योगदान ते एस एम जोशी,आचार्य अत्रे, प्रबोधनकार ठाकरे, सेनापती बापट, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, श्रीपाद डांगे, केशवराव जेधे, माधवराव बागल, भाई उद्धवराव पाटील शाहीर अमर शेख ,शाहीर गव्हाणकर शाहीर आत्माराम पाटील आदींचे तसेच संयुक्त महाराष्ट्रासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या हुतात्म्यांचे स्मरण करून गौरवशाली महाराष्ट्र घडवला अशा मान्यवरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करून ध्वजारोहण करण्यात आले.

जागतिक कामगार दिन याच दिवशी असल्याने नेवासा शहरात ज्यांनी आपलं अख्ख आयुष्य काम करण्यात वेचलं,प्रामाणिकपणे काम करत नेवासा शहराची भरभराट होण्यासाठी योगदान दिले अशा ६७ कामगारांचा यावेळी फेटा घालून व गुलाबपुष्प देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये दगड घडाई कामगार, पाथरवट, टापकर, गटई कामगार, टेलरिंग कामगार, रिक्षा ड्रायव्हर, कापड दुकानदार, किराणा दुकानदार,मेडिकल स्टोअर चालक,हलवाई या ठिकाणी असलेले कामगार, हॉस्पिटल मध्ये असलेले कामगार, स्वच्छता कामगार, पाणीपुरवठा कामगार,पेपर विक्रेते कामगार,मेकॅनिक कामगार, नाभिक कामगार अशा काही निवडक मान्यवर कामगारांचा समावेश होता.

यावेळी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी नगरपंचायतचे कार्यालयीन अधीक्षक सागर झावरे, उपनगराध्यक्ष सौ.शालिनीताई सुखदान,नगरसेविका सौ.जयश्रीताई शिंदे,गटनेते नगरसेवक महेश लोखंडे, जितेंद्र कुऱ्हे,अंकुश म्हस्के,प्रवीण आप्पा सरोदे, जालिंदर गवळी,निरंजन डहाळे,दिनेश व्यवहारे,कृष्णा परदेशी संदीप सरकाळे यांच्या सह कामगार नेते अनिल सोनवणे, मूर्तीकार बजरंग इरले,लक्ष्मण चांदणे,अशोक डौले, अशोक चौधरी,राजकुमार शेंडे,राजू परदेशी, विजय कापसे या कामगारांसह अनेक कामगार आणि सामान्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार सुधीर चव्हाण यांनी केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी विश्वास वाघमारे,सागर पवार,गौरव जाधव, अनिकेत ढोकणे,उदय सुसे यांनी विशेष प्रयत्न केले.

## सौ. प्रांजल अमित चिंतामणी यांनी पूर्ण केली 'स्व-गणना'

जामखेड : (स. गांवकरी)

- नागरिकांना केले आवाहन

देशाच्या प्रगतीसाठी आणि नियोजित विकासासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'जनगणना २०२७' या राष्ट्रीय मोहिमेत जामखेड नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सौ. प्रांजल अमित चिंतामणी यांनी स्वतः सहभागी होऊन एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नगराध्यक्षांनी अधिकृत पोर्टलवर आपली 'स्व-गणना' (Self-Enumeration) प्रक्रिया पूर्ण केली असून, या उपक्रमाद्वारे त्यांनी जामखेडच्या नागरिकांसमोर एक आदर्श ठेवला आहे. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ. चिंतामणी यांनी स्पष्ट केले की, "जनगणनेतूनच 'जनकल्याण' साध्य करता येते. आपली माहिती अचूक नोंदवणे हे केवळ शासकीय कर्तव्य नसून ते एक सामाजिक उत्तरदायित्व आहे. याच माहितीच्या आधारे भविष्यातील विकासकामे आणि योजना आखल्या जातात. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा."

यावेळी जामखेड नगर परिषदेचे मुख्याधिकारी तथा चार्ज अधिकारी यांनी शहराच्या जनगणनेच्या तयारीची माहिती दिली आणि जनगणना कार्याच्या अचूक आणि परिपूर्ण माहितीसाठी नागरिकांनी अधिकृत संकेतस्थळावर आपल्या कुटुंबाची माहिती अचूक भरावी, स्व-गणना पूर्ण केल्यानंतर मिळणारा 'स्व-गणना आयडी' (Self-Enumeration ID) काळजीपूर्वक जतन करून, जेव्हा शासननियुक्त प्रगणक आपल्या घरी माहितीyg पडताळणीसाठी येतील, तेव्हा त्यांना आपला हा 'स्व-गणना आयडी' त्वरित उपलब्ध करून द्यावा, जेणेकरून जनगणना प्रक्रिया अधिक जलद आणि पारदर्शक होईल अशी माहिती दिली.

## उन्हाची होरपळ अन् विजेचा खेळखंडोबा

- आ. रोहित पवारांच्या नेतृत्वाखाली कर्जतमध्ये ठिय्या आंदोलन
- वीज तात्काळ सुरळीत करण्याचं महावितरणचं आश्वासन






कर्जत : (स. गांवकरी)

कर्जत व जामखेड तालुक्यातील तीव्र वीज टंचाई आणि अनियमित वीजपुरवठ्याच्या प्रश्नांवर आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली कर्जत येथील महावितरण कार्यालयासमोर दि.१ मे रोजी ठिय्या आंदोलन करण्यात आलं. नागरिकांच्या वाढत्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर हे आंदोलन करण्यात आले.

मतदारसंघात ऐन उन्हाळ्यातील तीव्र उकाड्यात विजेच्या अनियमित व खंडित पुरवठ्यामुळे नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. तापमान ४० ते ४२ अंशांच्या पुढे गेलेलं असताना वीज वेळेवर उपलब्ध होत नसल्याने सर्वसामान्यांचं दैनंदिन जीवन विस्कळीत झालं आहे. लहान मुलं, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना उकाड्याचा तीव्र सामना करावा लागत असून, वाडी-वस्त्यांवर सिंगल फेज वीजही उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. शेतीसाठी आवश्यक असलेला थ्री फेज वीजपुरवठा अखंडित मिळत नसल्याने उन्हाळी पिकांचं नुकसान होत आहे. जळालेले डीपी वेळेत बदलले जात नाहीत, कोटेशन भरूनही नवीन वीजजोडण्या मिळत नाहीत, पूर्ण दाबाने वीजपुरवठा होत नाही, तसेच ‘मागेल त्याला सोलर’ योजनेअंतर्गत इंस्टॉलेशन व देखभाल कामांमध्ये विलंब होत असल्याच्या तक्रारीही नागरिकांनी मांडल्या. चिलवडी व माहीजळगाव उपकेंद्रांची प्रलंबित कामेही अद्याप पूर्ण झालेली नाहीत. विशेषतः ए.जी. फिडरवर सायंकाळी ६ ते ९ या वेळेत वीजपुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांच्या अडचणीत आणखी भर पडत आहे. या पार्श्वभूमीवर आ. रोहित पवार यांनी वारंवार पाठपुरावा करूनही ठोस तोडगा न निघाल्याने नागरिकांचा संताप वाढला होता. या गंभीर प्रश्नावर आ. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली कर्जत येथील महावितरण कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आलं. या आंदोलनात मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आ.रोहित पवार यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांना जाब विचारत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली. दरम्यान, आंदोलनानंतर महावितरणच्या अधिकाऱ्यांनी परिस्थितीची दखल घेत लवकरात लवकर वीजपुरवठा सुरळीत करण्याचं आश्वासन दिलं. सायंकाळी ६ ते ९ दरम्यान खंडित होणारा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात येईल, तसेच ज्या ठिकाणी अडचणी आहेत त्या ठिकाणी तातडीने उपाययोजना करण्यात येतील, असं अधीक्षक अभियंता श्री. पवार यांनी स्पष्ट केलं. अधिकाऱ्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर आंदोलन मागे घेण्यात आलं. मात्र, या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी आणि कितपत होते, याकडे कर्जत-जामखेडमधील नागरिकांचं लक्ष लागून आहे. यावेळी नामदेव राऊत, रघुआबा काळदाते, विश्वनाथ राऊत, विशाल म्हेत्रे, गुलाब तनपुरे, मंगेश आजबे, प्रशांत राळेभात, रामशेठ कानगुडे, अनिल पांडुळे, दीपक शिंदे, विष्णू नाना मोंढळे, ज्ञानदेव लष्कर, वसीम सय्यद, किशोर तापकीर, राजेंद्र गोरे, सुनील उबाळे, बापू कार्ले, बाबासाहेब गांगर्डे, राजेंद्र पवार, मनोज गायकवाड, अमोल पाटील, बाळासाहेब सपकाळ, किसन बापू ढवळे , संतोष नाना निगुडे, बिबिशन धनवडे, रज्जाक शेख, वैभव काळे, मनोज गायकवाड, राजेंद्र भांडवलकर, महादेव मोटे, डॉ. चंद्रकांत कोरडे, संदीप गांगर्डे, दत्ता साळुंके, गणेश चव्हाण, दादा राजे भोसले, विलास जगदाळे, रावसाहेब जाधव, सतीश चव्हाण, बजरंग डुचे, अशोक गीते, नय्युम शेख, दिलीप जाधव, महेश काळे यांच्यासह कर्जत जामखेड मधील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देऊन कामे करा - पालकमंत्री अतुल सावे

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

- खरीप हंगाम नियोजन बैठकीत विविध विषयांचा आढावा
- जलसंपदा, महावितरण यांनी समन्वयाने सुविधा द्याव्यात
- खतसाठा, पाणी, वीज पुरवठाबाबत लोकप्रतिनिधी यांच्या सूचना




खरीप हंगाम सर्वांनी समन्वय ठेऊन यशस्वी करावा. आगामी हवामान आधारित परिस्थिती लक्षात घेऊन शेतकरी हिताला प्राधान्य द्यावे. शेतकऱ्यांना पाणी, वीज, खतांचा मुबलक साठा उपलब्ध होईल याकडे प्रशासनाने लक्ष द्यावे. कामात कसूर करणाऱ्यांवर कडक कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री अतुल सावे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात 'खरीप हंगाम-२०२६' बैठक पार पडली. बैठकीस खासदार अशोक चव्हाण, खासदार रवींद्र चव्हाण, आमदार प्रताप पाटील चिखलीकर, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी पाटील कल्याणकर, आमदार आनंदराव तिडके (बोंढारकर),आमदार श्रीजया चव्हाण, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत आदी उपस्थित होते. पालकमंत्री सावे म्हणाले, बोगस बियाणे, खतांची साठेबाजी, पीक कर्ज देण्यात अडथळा आदी बाबत प्रशासनाने नियमानुसार कारवाई करावी. याबाबत कृषीशी संबंधित असलेल्या शासकीय, खासगी यंत्रणा यांच्याशी बैठक आयोजित करावी. तसेच महावितरण बाबत शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत राज्यस्तरावर बैठकीचे आयोजन लवकरच करण्यात यईल, असेही पालकमंत्री म्हणाले. खतांची साठेबाजी रोखण्यासाठी भरारी पथके नेमून यावर आळा घालण्याच्या सूचना त्यांनी कृषी विभागाला दिल्या. अल निनोच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना येत्या खरीप हंगामात मार्गदर्शन करावे. शेतकऱ्यांना सोलार पंप विहित वेळेत उपलब्ध करुन न देणाऱ्या कंपन्यावर कारवाई करण्यात येईल, असेही निर्देश त्यांनी दिली. जिल्ह्यात सध्या खताचा मुबलक साठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील खताचा साठा इतर राज्यात जावू नये यासाठी भरारी पथके नेमली आहेत. खत उपलब्धतेसाठी क्युआर कोड केले आहेत. क्युआर कोडच्या माध्यमातून शेतकऱ्यांना खताची उपलब्धतेची माहिती मिळेल. शेतकऱ्यांना कर्जपुरवठा नियमित होण्यासाठी लवकरच शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. जिल्ह्यात अल निनोच्या पार्श्वभूमीवर पशुसंवर्धन विभागाच्यावतीने जिल्हा चारा आराखडा तयार करण्यात आला असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना कोणत्याही बाबीची अडचणी येणार नाहीत याबाबत आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. प्रत्येक ग्रामपंचायतीत पर्जन्यमापक यंत्र लावण्याची कार्यवाही प्रगतीपथावर असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. मिर्ची संशोधन केंद्र, सोयाबीन, केळी संशोधन केंद्राचे प्रस्ताव लवकरच शासनास सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. नांदेड शहरात कृषी भवनासाठी जागा उपलब्ध करुन याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्याचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या निधनानंतर कृषी विभागाची ही पहिलीच बैठक होत असल्याने, बैठकीच्या सुरुवातीला पालकमंत्री सावे यांच्या उपस्थितीत दिवंगत अजितदादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. खासदार अशोक चव्हाण यांनी शेतकऱ्यांना येत असलेल्या अडचणी मांडल्या. त्यांच्यासह खासदार रवींद्र चव्हाण, आमदार चिखलीकर, आमदार कल्याणकर, आमदार तिडके, आमदार पवार, आमदार श्रीजया चव्हाण यांनीही विविध सूचना मांडल्या. जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांनी प्रशासनाकडून करण्यात आलेली कार्यवाही आणि आगामी नियोजन याबाबत माहिती सादर केली. प्रास्ताविक कळसाईत यांनी केले. या बैठकीत 'खरीप हंगाम २०२५' मधील कामकाजाचा आढावा घेण्यात आला तसेच मागील बैठकीत उपस्थित केलेल्या मुद्द्यांबाबत अनुपालन अहवाल सादर करण्यात आला. याव्यतिरिक्त खालील महत्त्वपूर्ण कृषी विषयक बाबींचा व योजनांचा सविस्तर आढावा घेण्यात आला: कृषी सांख्यिकी व पर्जन्यमान: नांदेड जिल्ह्याची कृषी विषयक सर्वसाधारण माहिती, ११ व्या कृषी गणनेनुसार जिल्ह्यातील सीमांत, अत्यल्प, अल्प व इतर खातेदार आणि त्यांची जमीन धारणा, तसेच सन २०२५ मधील महिनानिहाय पर्जन्यमान. नैसर्गिक आपत्ती व पीक नुकसान: नैसर्गिक आपत्तीमुळे झालेले पीक नुकसान आणि २०२६ च्या मोसमी पावसाचे दीर्घावधी पूर्वानुमान. खरीप हंगाम सन २०२५ मधील 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'त सहभागी शेतकरी व त्यांना मिळालेली नुकसान भरपाई, 'पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना' (आंबिया बहार), 'गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान' आणि 'पीएम किसान' योजना.

### जिल्हाधिकारी व कृषी अधिकाऱ्यांचा गौरव

खरीप हंगाम सन २०२५ मधील 'प्रधानमंत्री पीक विमा योजने'अंतर्गत जिल्ह्यात ८१३ कोटी रुपयांची विमा रक्कम मंजूर झाल्याबद्दल, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले आणि जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत यांचा पालकमंत्री सावे यांच्या हस्ते विशेष गौरव करण्यात आला. याबाबतचा अभिनंदनाचा ठराव आमदार चिखलीकर यांनी मांडला आणि पालकमंत्री सावे यांनीही प्रशासनाच्या कामाचे कौतुक केले.

## थोडक्यात पण महत्वाचे



### शिरसगाव येथे बुद्ध वंदना गाऊन भगवान गौतम बुद्धांची जयंती साजरी

- आजच्या परिस्थितीत युद्धाची नव्हे तर बुद्धांच्या विचारांची गरज-सौ. रत्नमालाताई लंघे

नेवासा (स. गांवकरी) : नेवासा तालुक्यातील शिरसगाव येथे बुद्ध वंदना गाऊन भगवान गौतम बुद्धाची बुद्ध जयंती साजरी करण्यात आली. भगवान गौतम बुद्धाचे विचार अंगिकारल्यास जगात शांतता नांदेल,आजच्या परिस्थितीत युद्धाची नव्हे तर बुद्धांच्या विचारांची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार सौभाग्यवती सौ.रत्नमालाताई लंघे पाटील यांनी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी बोलतांना केले. शिरसगाव येथे झालेल्या कार्यक्रम प्रसंगी आयोजक बहुजन चळवळीतील नेते सुनील वाघमारे यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले तर अमोल मोरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी योहान वाघमारे व सौ.सावित्रीबाई वाघमारे, सुनील वाघमारे व सौ.मंगलताई वाघमारे यांनी बुद्ध वंदना म्हटली,यावेळी सौ.लंघे ताईंच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मेणबत्त्या पेटवून व पुष्पांजली अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी कार्यक्रम संयोजक सुनील वाघमारे यांनी भगवान गौतम बुद्धाचे कार्य मानवता व समानतेच्या विचार याबाबत व्याख्यान देऊन उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन केले.युवा नेते राजेंद्र मते,विवेकभैय्या लंघे यांनी भगवान गौतम बुद्धांचे जीवनकार्य यावेळी झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी हरीचंद्र लंघे,सुनील लंघे,पांडुरंग लंघे,ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब आगळे,बाळासाहेब देशमुख,बाळासाहेब केदारे,सचिन लंघे, दिलीप दराडे,डॉ. बाळासाहेब पडघन, दीपक आगळे,दिलीप खंडागळे,शिवाजी पोटे, आनंद वाकडे,कडूबाळ गायकवाड,संतोष खंडागळे, कैलास गायकवाड, मनिषा देशमुख,सौ.मंगलताई काळे,रंजनाताई पोटे,सरलाताई लंघे,सावित्रीबाई वाघमरेम,मंगल वाघमारे, सुषमा खंडागळे,कावेरी मोरे,सोनाली मोरे,द्रोपदी भालेराव येणूबाई खंडागळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. बुद्ध जयंती निमित्ताने अनेक मान्यवरांनी येथे भेटी देऊन भगवान गौतम बुद्धाच्या मूर्तीचे मेणबत्त्या व पुष्पांजली अर्पण करून दर्शन घेतले.

### बारावीचा निकाल ८९.७९ टक्के, गेल्या वर्षीपेक्षा २.९ टक्क्यांनी घट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल ८९.७९ टक्के निकाल लागला. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा सुमारे २.९ टक्क्याने निकाल घटला आहे. कोकण विभागाचा सर्वाधिक ९४.१४ टक्के, लातूर विभागाचा सर्वांत कमी ८४.१४टक्के निकाल लागला. राज्य मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी राज्य मंडळात झालेल्या पत्रकार परिषदेत निकाल जाहीर केला. मंडळाचे सचिव डॉ. दीपक माळी, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, बालभारतीच्या संचालक अनुराधा ओक, योजना संचालक कृष्णकुमार पाटील, माध्यमिक सहसंचालक डॉ. श्रीराम पानझाडे, कोल्हापूर विभागीय मंडळाचे अध्यक्ष राजेश क्षीरसागर या वेळी उपस्थित होते. गेल्यावर्षी बारावीचा निकाल ९१.८८ टक्के लागला होता. दरवर्षीप्रमाणेच यंदाही मुलींनीच निकालात बाजी मारली आहे. ९३.२५ टक्के मुली, तर ८६.८० टक्के मुले उत्तीर्ण झाली. त्यामुळे मुलांच्या तुलनेत ६.३५ टक्के अधिक मुली उत्तीर्ण झाल्या आहेत. परीक्षा घेण्यात आलेल्या १५४ विषयांपैकी २६ विषयांचा निकाल १०० टक्के लागला. गेल्या वर्षीच्या निकालाची एकूण उत्तीर्ण टक्केवारी ९१.८८ टक्के होती. दरवर्षीप्रमाणे गेल्या वर्षीही मुलींनीच आघाडी घेतली होती. मुलींची उत्तीर्ण टक्केवारी ९४.५४ टक्के इतकी होती, तर मुलांची उत्तीर्ण टक्केवारी ८९.५१ टक्के एवढी होती.

### राज्याला अवकाळी पावसाचा इशारा, "या" जिल्ह्यांना अलर्ट

अहिल्यानगर (स. गांवकरी) : राज्यात कडाक्याच्या उन्हाने नागरिक हैराण झाले असतानाच आता हवामानात पुन्हा एकदा मोठा बदल होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. एप्रिलच्या अखेरीपासून तापमानात सातत्याने वाढ होत असून अनेक ठिकाणी उष्णतेची लाट जाणवत आहे. मात्र आज अनेक जिल्ह्यांना पावसाचा इशारा देण्यात आला आहे. पुढील काही दिवस हे वातावरण कायम राहणार असून उर्वरित जिल्ह्यांमध्ये उकाडा कायम राहणार आहे. त्यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, आज २ मे रोजी कोकण-गोवा परिसरात अंशतः ढगाळ वातावरण राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे किनारपट्टी भागात उष्णतेचा तडाखा काही प्रमाणात कमी जाणवू शकतो. मात्र मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात बहुतांश ठिकाणी आकाश निरभ्र राहण्याचा अंदाज असून तापमानात विशेष घट होण्याची शक्यता नाही. मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये सकाळच्या वेळी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे.

## शब्दगंध संमेलनाची बैठक संपन्न

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

शब्दगंध साहित्यिक परिषदेच्या आगामी राज्यस्तरीय साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीत संमेलन अधिक व्यापक, सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. नवोदित कवी-लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी यंदाच्या संमेलनात गझल संमेलन व दोन स्वतंत्र काव्यसत्रांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती कार्याध्यक्ष तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे यांनी दिली. मान्यवर आणि नवोदित यांचा सुरेख मेळ घालून संमेलन यशस्वी करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीला संस्थापक सचिव सुनील गोसावी, माजी प्राचार्य डॉ.जी.पी.ढाकणे, राज्य संघटक प्रा. डॉ. अशोक कानडे, खजिनदार भगवान राऊत तसेच राज्य कार्यकारिणी सदस्य राजेंद्र चोभे, नवजीवन संस्थेचे राजेंद्र पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीत संमेलनाच्या विविध अंगांवर सविस्तर चर्चा करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. यामध्ये 'शब्दगंध कार्य गौरव पुरस्कार', 'जीवन गौरव पुरस्कार', 'उत्कृष्ट शाखा पुरस्कार', 'कवी कट्टा', 'संयोजन समितीची रचना', 'प्रमुख पाहुण्यांची निवड', तसेच 'असा मी घडलो' या विशेष उपक्रमाचा समावेश आहे. काव्यसंमेलनाच्या अध्यक्षपदाबाबतही चर्चा करून लवकरच अंतिम निर्णय जाहीर केला जाणार असल्याचे सांगण्यात आले. अहिल्यानगरचे विद्यमान आमदार संग्राम भैय्या जगताप, तसेच १६ व्या संमेलनाचे स्वागताध्यक्ष आणि नगरसेवक संपत दादा बारस्कर यांच्या प्रमुख उपस्थितीत नव्या स्वागताध्यक्षांची निवड लवकरच करण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

## नाशिक ग्रामीणमध्ये 'डॅशिंग' बदल!

### डॉ. डी. एस. स्वामींची एन्ट्री : माफियांवर आता खरोखरच लगाम लागणार का?

नाशिक : (स. गांवकरी)



नाशिक ग्रामीण पोलीस दलात मोठा प्रशासकीय बदल झाला असून, कडक कारवाईसाठी ओळखले जाणारे अधिकारी डॉ. डी. एस. स्वामी यांची पोलीस अधीक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तर विद्यमान अधीक्षक बाळासाहेब पाटील यांची बदली मुंबई पोलीस उपआयुक्त (DCP) पदावर करण्यात आली आहे. या बदलामुळे जिल्ह्यात नव्या नेतृत्वाची सुरुवात झाली असली तरी नागरिकांच्या मनात एकच प्रश्न आहे – अवैध दारूचा सुळसुळाट खरोखर थांबणार का? कळवण तालुक्यातील ओतूर व परिसर मागील काळात देशी-विदेशी अवैध दारू विक्रीचा अक्षरशः बालेकिल्ला निर्माण झाला होता. गावोगावी उघडपणे डांबरी रस्त्याच्या कडेला दिवसभर देशी विदेशी दारू विक्री सुरू असलेल्या या धंद्यामुळे महिलांचे संसार उद्ध्वस्त होत आहेत, तर तरुण पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत आहे. विशेष म्हणजे, उत्पादन शुल्क विभागाकडून सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे आणि कथित "हप्तेखोरी"मुळे हा अवैध व्यवसाय दिवसेंदिवस फोफावत गेला. स्थानिकांकडून वारंवार तक्रारी, बातम्या प्रसिद्ध होऊनही रस्त्यांवर खुलेआम दारू विक्री सुरूच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. "सध्याची परिस्थिती आपण दोघे भाऊ आणि दोघं मिळून खाऊ" अशी परिस्थिती असल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, डॉ. स्वामी यांचा पूर्वीचा कार्यकाळ लक्षात घेतल्यास त्यांनी गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण मिळवत गुन्हेगारांमध्ये भीती निर्माण केली होती. त्यामुळे त्यांच्या अगमनाने अवैध दारू गुटखा, अमली पदार्थविक्रेते, स्थानिक टोळ्या आणि बेकायदेशीर धंद्यांवर मोठा आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांनीही या बदलाचे स्वागत केले असले तरी आता मात्र डॉ स्वामीची खरी कसोटी आहे ती कारवाईची.

फक्त बदली झाली म्हणून चित्र बदलणार नाही – तर प्रत्यक्षात धडक मोहीम राबवून दारू माफियांना चाप बसवला, तरच लोकांचा विश्वास प्रशासनावर परत मिळेल.

आता पाहायचे इतकेच –की. डॉ. स्वामींचा धडाकेबाज अंदाज कागदावरच राहणार, की खरोखरच कळवणसह संपूर्ण नाशिक ग्रामीणमध्ये कायद्याचा धाक निर्माण होणार?

## चिचोंडी पाटील येथे उत्साहात विविध उपक्रम

### सुप्रसिद्ध साहित्यिक संजय कळमकर मार्ग असे रस्त्याचे नामकरण

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त चिचोंडी पाटील येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. ग्रामपंचायत कार्यालयात ध्वजारोहण सुप्रसिद्ध साहित्यिक मा.संजय कळमकर यांच्या हस्ते संपन्न झाले.तर जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत मुख्याध्यापक पाटील सर यांच्या हस्ते, तसेच रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये स्कूल कमिटीचे अध्यक्ष आबासाहेब कोकाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. सर्व ठिकाणी देशभक्तीपर वातावरणात कार्यक्रम पार पडले. महाराष्ट्र व कामगार दिनाच्या निमित्ताने ग्रामपंचायतीतर्फे कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ग्रामस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या "न्यू आरो प्लांट"चे उद्घाटन महाराष्ट्र सरपंच परिषदेचे अध्यक्ष दत्ताभाऊ काकडे, सुप्रसिद्ध साहित्यिक डॉक्टर संजय कळमकर, प्रशासक सरपंच शरद पवार, उपसरपंच यशोदाताई कोकाटे, ज्येष्ठ नेते आबासाहेब कोकाटे सर, आप्पासाहेब पवार, चेअरमन संदीप कोकाटे,महादेव खडके, गटनेते वैभव कोकाटे महिला भगिनी,ग्रामस्थ पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते करण्यात आले. या प्लांटमुळे ग्रामस्थांना केवळ १० रुपयांत २० लिटर शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. यावेळी "माझा गाव माझा अभिमान" या उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.चिचोंडी पाटील गावाचे नाव राज्यभर नेणारे हास्य विनोदी सम्राट, कायम विद्यार्थ्यांसाठी अभिनव उपक्रम राबवणारे "सुप्रसिद्ध साहित्यिक संजय कळमकर मार्ग" असे रस्त्याचे नामकरण करण्यात आले. या उपक्रमांतर्गत गावाच्या सर्वांगीण विकासासाठी विविध अभिनव व लोकहिताचे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. कार्यक्रमास ग्रामपंचायत सदस्य संदीप काळे,माऊली ठोंबरे,प्रशांत कांबळे,महादजी कोकाटे,दत्तू धुळे, विश्व सागर कोकाटे,उद्योजक चंदूकाका पवार, प्रल्हाद खांदवे,दिलीप पवार, बाळासाहेब ठोंबरे, अरुण दवणे, सुरेश ठोंबरे,अर्जुन वाडेकर, पाचारणे सर, शेख सर, psi भास्कर भद्रे साहेब, कल्याण कोकाटे सावकार, खुशाल पवार, संजय पवार, युवराज हजारे, प्रशांत पवार, भाऊ मांढरे,श्रीकांत कराळे, निखिल पवार युवराज देवकर राजू तनपुरे किरण मोरे सुरेश गाडे सचिन कांबळे विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थ, पदाधिकारी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर देशभक्ती व अभिमानाच्या वातावरणाने भारावून गेला होता.

कार्यक्रमाच्या शेवटी कार्यसम्राट प्रशासक/सरपंच शरदभाऊ पवार यांनी उपस्थितांचे आभार मानून सर्वांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## लाडक्या बहिणींना सरकार मोठं गिफ्ट देणार

अहिल्यानगर : (स. गांवकरी)

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेणाऱ्या राज्यातील महिलांना ईकेवायसी दुरूस्तीसाठी दिलेली मुदत ३० एप्रिल रोजी संपली आहे. ईकेवायसी प्रोसेस झाल्यानंतर आता लाडकीच्या खात्यात पैसे कधी येणार? असा सवाल पात्र महिलांना पडला आहे. मार्च, एप्रिल महिन्याचा हप्ता अजून लाडक्या बहिणींच्या खात्यात आलेला नाही. त्यात आता मे महिना सुरू झाला आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना सरकार एकत्र ४५०० रूपये देणार का? या चर्चेला सुरूवात झाली आहे. ईकेवायसी दुरूस्तीनंतर राज्यातील लाडक्या बहिणींची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार अर्ज बाद झाले, अपात्र ठरले अथवा अर्जच भरला नाही अशा लाडक्या बहिणींची संख्या तब्बल ५४ लाख असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या ५४ लाख लाडक्या बहिणींचा १५०० रूपयांचा हप्ता आता कायमचा बंद झाला आहे. त्यामुळे सरकारचे प्रत्येक महिन्याला कोट्यवधि रूपये वाचणार आहे. ई-केवायसी प्रक्रियेनंतर १ कोटी ८९ लाख बहिणी पात्र ठरल्याची माहिती समोर आली आहे. महाराष्ट्र सरकारकडून ईकेवायसी दुरूस्तीची मुदत वाढवण्यात आली नाही. त्यामुळे राज्यात १ कोटी ८९ महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ प्रत्येक महिन्याला मिळणार आहे. राज्यातील पात्र महिलांच्या खात्यात फेब्रुवारी महिन्यापर्यंत १५०० रूपये जमा झाले आहेत.

# ज्ञानसंपदा शाळेत त्रिस्मरणीय दिवसांचा उत्सव

### महाराष्ट्र दिन, कामगार दिन व बुद्ध पौर्णिमा देशभक्तीच्या जल्लोषात साजरे

अहिल्यानगर : (स. गांवकरी)




दि. १ मे रोजी ज्ञानसंपदा शाळेत महाराष्ट्र दिन, जागतिक कामगार दिन व बुद्ध पौर्णिमा मोठ्या उत्साहात व देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरे करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या गायकवृंदाने सादर केलेल्या राष्ट्रगीत, ध्वजगीत व महाराष्ट्र गीताने झाली. तसेच 'माझ्या मराठी भाषेचा लावा ललाटास टिळा' या गीताने मराठी भाषेचा अभिमान जागवला.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विठ्ठलराव विखे पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटलचे मेडिकल सुपरिंटेंडेंट डॉ. सतीश मोरे तसेच बालरोग तज्ञ डॉ. रवींद्र वाकडे उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांनी करून दिला. संस्थेचे अध्यक्ष श्री प्रवीण बजाज व उपाध्यक्ष मिलिंद गंधे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. सतीश मोरे यांनी आरोग्य जपण्याचे महत्त्व सांगत मानसिक, सामाजिक व आध्यात्मिक आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आवाहन केले. उपाध्यक्ष मिलिंद गंधे यांनी शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी आयुष्मान भारत योजनेअंतर्गत विमा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा केली व कोणतेही काम कमी दर्जाचे नसते, हा मोलाचा संदेश दिला. विद्यार्थिनींनीही आपली मनोगते प्रभावीपणे मांडली. कु. श्रेया करवंदे (कामगार दिन), कु. श्रुती गहिरे (महाराष्ट्र दिन) व कु. खुशी काळे (बुद्ध पौर्णिमा) यांनी आपल्या भाषणातून महत्त्वपूर्ण विचार मांडले.

सूत्रसंचालन इयत्ता दहावीतील ओम पेठे व अक्षरा राठोड यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका श्रीमती शिवांजली अकोलकर यांनी केले. शाळेस सहकार्य करणाऱ्या पालकांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. 'वंदे मातरम्'ने कार्यक्रमाची सांगता झाली.

या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, सामाजिक बांधिलकी व कृतज्ञतेची भावना दृढ झाली. महाराष्ट्र दिनाने राज्याभिमान, कामगार दिनाने श्रमाचे महत्त्व आणि बुद्ध पौर्णिमेने शांतता व मानवतेचा संदेश दिला. मान्यवरांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला प्रेरणा मिळाली.

# किनवटमध्ये स्वगणना मोहिमेला उत्साहात प्रारंभ

- नगराध्यक्ष सुजाता विनोद येंड्रलवार यांच्या हस्ते शुभारंभ
- नागरिकांना सक्रिय सहभागाचे आवाहन



किनवट : (स. गांवकरी)

भारत सरकारच्या महत्त्वपूर्ण उपक्रम असलेल्या जनगणना 2027 अंतर्गत किनवट नगरपरिषद हद्दीत स्वगणना (Self Enumeration) प्रक्रियेला उत्साहपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. या मोहिमेचा शुभारंभ शहराच्या प्रथम नागरिक तथा नगराध्यक्ष सौ. सुजाता विनोद येंड्रलवार यांच्या हस्ते स्वतः स्वगणना करून करण्यात आला.

यावेळी बोलताना नगराध्यक्षांनी नागरिकांना स्वगणना प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवण्याचे आवाहन केले. "अचूक व प्रामाणिक माहिती ही शहराच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची असते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने ही प्रक्रिया गांभीर्याने पूर्ण करावी," असे त्यांनी सांगितले. स्वगणना मोहिमेचा कालावधी दि. 1 मे ते 15 मे 2026 असा निश्चित करण्यात आला आहे. या कालावधीत नागरिकांनी केंद्र सरकारच्या अधिकृत संकेतस्थळावर भेट देऊन स्वतःची व कुटुंबाची माहिती नोंदवावी, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

स्वगणना ही पारंपरिक जनगणनेच्या तुलनेत अधिक सुलभ, आधुनिक आणि पारदर्शक पद्धत मानली जाते. नागरिक स्वतः माहिती भरत असल्यामुळे माहितीची अचूकता वाढते, तसेच संपूर्ण प्रक्रिया जलद आणि परिणामकारक ठरते. यामुळे भविष्यातील शहरी नियोजन, पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य व इतर विकासकामांसाठी विश्वासार्ह माहिती उपलब्ध होणार आहे. या प्रसंगी नगरपरिषद किनवटचे मुख्याधिकारी मुगाजी काकडे, सर्व नगरसेवक, तसेच विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी नागरिकांना स्वगणनेची संपूर्ण प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे आणि माहिती अचूकपणे कशी भरावी याबाबत मार्गदर्शन केले.




ठाणे : 'Eat Hot, Hit Hard' हे ब्रीदवाक्य घेऊन वडापावला कॉर्पोरेट ओळख देणारा देशातील पहिला नोंदणीकृत स्ट्रीट फूड ब्रँड 'ROKO वडापाव' आता दिवा शहरात अधिकृतपणे दाखल झाला आहे. एका भव्य सोहळ्यात या ब्रँडच्या मुख्य स्टॉलचे उद्घाटन पार पडले असून, आजपासून दिव्यातील तब्बल १० वेगवेगळ्या ठिकाणी हे स्टॉल्स नागरिकांच्या सेवेसाठी सज्ज झाले आहेत.

## थोडक्यात बातम्या...

### शशिकलाबाई जाधव यांचे निधन



नांदेड (स. गांवकरी) : शशिकलाबाई भगवानराव जाधव (वय-८०, रा.तळणी ता.हदगाव) यांचे ३० एप्रिल रोजी रात्री निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर १ मे रोजी सकाळी ११ वाजता तळणी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या पश्चात पती, मुले, चार सुना . नातवंडे असा परिवार आहे. सेवानिवृत्त सहशिक्षक भगवानराव जाधव यांच्या त्या पत्नी तर शेतकरी राजेंद्र जाधव व सिडको,नांदेड येथील सकाळचे बातमीदार श्याम जाधव यांच्या त्या मातोश्री होत्या.

### आरक्षणाच्या न्याय वितरणासाठी उपवर्गीकरणाचा कायदा पारीत करावा

मुखेड (स. गांवकरी) : मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने दि. 1 ऑगस्ट 2024 रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाद्वारे राज्यांना अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा घटनात्मक अधिकार प्रदान केला आहे. या निर्णयामध्ये वास्तविक समानता, अंतर्गत मागासलेपणा व अपुरे प्रतिनिधित्व या निकषांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती सामाजिक, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या एकसंघ नसून त्या विविध स्तरांमध्ये विभागलेल्या आहेत. प्रत्यक्षात काही मोठ्या जातींनी आरक्षणाचा मोठा लाभ घेतला असून मातंग व सत्सम जाती आजही सर्व क्षेत्रात मागे राहिलेल्या आहेत. त्यामुळे उपवर्गीकरण करणे ही काळाची गरज आहे. भारतामधील कर्नाटक, हरियाणा, तेलंगाना, आंध्रप्रदेश, केरळ, पंजाब व तामिळनाडू या राज्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर उपवर्गीकरणाची अंमलबजावणी केली आहे. विशेषतः हरियाणा राज्याने वंचितता आणि अल्प प्रतिनिधित्व या निकषांवर आधारित दोन गटांची रचना केली आहे. महाराष्ट्र शासनाकडून उपवर्गीकरण करताना लोकसंख्या किंवा जातवार महामंडळांचा आधार घेतला जात असल्याची माहिती समोर येत आहे. तथापि, असा आधार सर्वोच्च न्यायालयाच्या निकषांशी विसंगत असून तो घटनात्मक तत्त्वांना धरून नाही. उपवर्गीकरणाचा उद्देश आरक्षणाचा लाभ खऱ्या अर्थाने वंचित घटकांपर्यंत पोहोचवणे हा आहे.

### 'डाऊन्स सिंड्रोम' व अल्पदृष्टीवर मात करत सलोनीचे १२ वीत देदीप्यमान यश



ठाणे, शहापूर (स. गांवकरी) : 'इच्छा तिथे मार्ग' या उक्तीचा प्रत्यय ठाणे जिल्ह्यातील शहापूरच्या सलोनी काबाडी हिने पुन्हा एकदा आणून दिला आहे. जन्मतःच 'डाऊन्स सिंड्रोम' आणि अल्पदृष्टी यांसारख्या आव्हानांशी झुंज देणाऱ्या सलोनीने, बारावीच्या परीक्षेत ७१ टक्के गुण मिळवून प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यश संपादन केले आहे. तिची ही यशोगाथा सध्या संपूर्ण तालुक्यात कौतुकाचा आणि प्रेरणेचा विषय ठरली आहे. शहापुरात हार-तुऱ्यांचा व्यवसाय करणारे अरुण व अक्षदा काबाडी यांची सलोनी ही धाकटी मुलगी. दहावीतही उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या सलोनीसमोर बारावीच्या परीक्षेदरम्यान एक मोठे संकट उभे राहिले. परीक्षेच्या अवघ्या १० दिवस आधी घरात तोल जाऊन पडल्याने तिच्या कंबरेला गंभीर दुखापत (बॉल डिसलोकेशन) झाली. मात्र, शारीरिक वेदना आणि डॉक्टरांच्या उपचारांनंतरही तिने हार न मानता व्हिलचेअरवरून परीक्षा देण्याचा धाडसी निर्णय घेतला. दृष्टीदोष असल्याने सलोनीला वाचन करताना अडचणी येत होत्या. त्यावर तिने आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उपाय शोधला. यूट्यूबवर शैक्षणिक व्हिडिओ ऐकून संकल्पना स्पष्ट केल्या. ऑनलाईन ऑडिओ नोट्सच्या माध्यमातून अभ्यासाची उजळणी केली. परीक्षेत ११ वीची विद्यार्थिनी कु. श्रेया दलाल हिने सलोनीसाठी 'रायटर' म्हणून मोलाची भूमिका बजावली. सलोनीने शहापुरातील खाडे विद्यालय येथे १७ क्रमांकाचा फॉर्म भरून ही परीक्षा दिली. या प्रवासात खाडे विद्यालयातील शिक्षक, डॉ. शेलवले यांचे उपचार आणि तिच्या कुटुंबाचा खंबीर पाठिंबा तिला लाभला. शहापूरच्या शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष संतोष देशमुख व इतर पदाधिकाऱ्यांनी सलोनी आणि काबाडी दाम्पत्याचा विशेष सन्मान केला. सलोनीला भविष्यात तिला बँकिंग क्षेत्रात करिअर करायचे आहे.

### जय भवानीगड विकास प्रतिष्ठानने जपली उज्वल यशाची परंपरा कायम




इंदापूर (स. गांवकरी) : जय भवानीगड विकास प्रतिष्ठान संचलित, विद्यानिकेतन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज लाखेवाडी मध्ये उच्च माध्यमिक बोर्ड परीक्षा 2026 च्या परीक्षेसाठी विद्यालयातील एकूण 327 विद्यार्थी परीक्षेसाठी बसले होते, त्यापैकी 327 विद्यार्थी पात्र झाले आहेत म्हणजेच विद्यालयाचा 100 % निकाल लागला आहे. विद्यानिकेतन स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज लाखेवाडी मध्ये विज्ञान व कॉमर्स अशा दोन शाखा असून दोन्ही शाखेतील उच्च माध्यमिक बोर्ड परीक्षेत घवघवीत यश मिळवले आहे. 327 विद्यार्थ्यांपैकी 318 विद्यार्थी विशेष प्राविण्यासह पास झाले आहेत. 09 विद्यार्थी द्वितीय श्रेणीने पास झाले आहेत. विज्ञान विभागातील एकूण 283 विद्यार्थी पात्र ठरले आहेत, पीकविज्ञान या विषयात 10 विद्यार्थ्यांनी 200 पैकी 200 गुण मिळवून राज्यात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला आहे.

## कोतुळ प्राथमिक आरोग्य केंद्रात
# ९ ते १४ वयोगटातील मुलींना एचपीव्ही लसीकरण

**गर्भाशयाच्या कॅन्सरपासून संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल!**



कोतुळ : (स. गांवकरी)

कोतुळ प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत परिसरातील ९ ते १४ वयोगटातील मुलींना एचपीव्ही (ह्युमन पॅपिलोमा व्हायरस) प्रतिबंधक लस देण्यात आली. गर्भाशयाच्या मुखाच्या कॅन्सरपासून संरक्षण देणारी ही लस आरोग्यदायी भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. वैद्यकीय तज्ज्ञांच्या माहितीनुसार, जगभरात सर्व्हायकल कॅन्सरमुळे दरवर्षी सुमारे तीन लाख महिलांचा मृत्यू होतो. मात्र एचपीव्ही लसीकरणामुळे गर्भाशयाच्या कॅन्सरचा धोका तब्बल ९० टक्क्यांपर्यंत कमी होऊ शकतो. एचपीव्ही म्हणजे ह्युमन पॅपिलोमा व्हायरस. या विषाणूचे १०० पेक्षा अधिक प्रकार आहेत. संसर्ग झाल्यानंतर अनेकदा कोणतीही लक्षणे दिसून येत नाहीत. काही प्रकारांमुळे हात, पाय, गुप्तांग किंवा तोंडाच्या आतील भागात फोड/वॉर्ट्स येऊ शकतात, तर काही प्रकारांमुळे कॅन्सरचा धोका निर्माण होऊ शकतो. तज्ज्ञांच्या मते, हा संसर्ग प्रामुख्याने लैंगिक संपर्कातून पसरतो आणि सुमारे ८० टक्के लोकांना आयुष्यात कधीतरी या विषाणूचा संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे लैंगिकदृष्ट्या सक्रिय होण्यापूर्वी, म्हणजेच पौगंडावस्थेत मुला-मुलींना ही लस दिल्यास ती अधिक प्रभावी ठरते. ही लस गर्भाशयाच्या मुखाचा, जननेंद्रियांचा तसेच काही प्रमाणात डोके व मानेच्या कॅन्सरला कारणीभूत ठरणाऱ्या विषाणूंपासून संरक्षण देते. लस घेतल्यानंतर किमान १० वर्षांपर्यंत संरक्षण मिळू शकते, असे आरोग्य विभागाने स्पष्ट केले.

सध्या ९ ते १४ वयोगटातील मुला-मुलींना ही लस देण्यात येत असून महिलादेखील ४५ वर्षांपर्यंत ही लस घेऊ शकतात. कोतुळ प्राथमिक आरोग्य केंद्रात ही लस उपलब्ध असून पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नांदेड तालुक्यातील वाजेगाव ग्रामपंचायतीत निधी अपहाराचा आरोप

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

नांदेड तालुक्यातील श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाजेगाव ग्रामपंचायतीत शासकीय निधीच्या अपहाराचा गंभीर प्रकार समोर आला असून, याप्रकरणी सरपंच जमील अहेमद शेख यांच्यासह तत्कालीन ग्रामसेवक एस.एस.बोथीकर, एस. एस.देशमुख व इतर संबंधितां विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पत्रकार लतीफखान पि. पिरखान पठाण यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी सरपंच व त्यांच्या काही सहकाऱ्यांनी सन 2010 मध्ये ग्रामपंचायत वाजेगावच्या निवडणुकीत विजय मिळविला होता. तेव्हापासून आजपर्यंत ग्रामपंचायत वाजेगावमध्ये सरपंच पदावर शेख जमील अहेमद यांचेच वर्चस्व असल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, सरपंच शेख जमील यांनी मृत व्यक्तीच्या नावाने 06/08/2016 रोजी व्यवहार केला,शेख हुसनाबी शेख मस्तान या महिलेचे निधन 11/04/2016 रोजी झाले असून, त्याची नोंद ग्रामपंचायत कार्यालयात आहे. तरीदेखील, सरपंचांनी ग्रामसेवक एस.एस. देशमुख यांच्या मदतीने मृत महिलेच्या नावाने बँकेतून 12,000 रुपये काढून शासकीय निधीचा अपहार केल्याचा आरोप आहे.तसेच, ग्रामपंचायत कार्यालयाच्या सार्वजनिक खाते क्रमांक 02211100033770 (डी. सी.बी. बँक, बरारा टॉवर, नांदेड) मधून 28/08/2015 रोजी धनादेश क्रमांक 6585021 व 602826 द्वारे सरपंच जमील अहमद यांनी, ग्रामसेवक एस. एस. देशमुख यांच्या मदतीने, लोकप्रतिनिधी कायद्याचे उल्लंघन करून 1,44,000 रुपये स्वतःच्या नावावर काढल्याचा आरोप आहे.

## प्रभाग क्रमांक १ मधून स्वच्छता मोहिमेचा उत्साहात शुभारंभ




किनवट : (स. गांवकरी)

शहर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी ठेवण्याच्या उद्देशाने नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विशेष स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ नगराध्यक्षा सौ. सुजाता येंड्रलवार व युवा नेते करण येंड्रलवार यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रभाग क्रमांक १ मधून उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. येंड्रलवार यांनी नागरिकांनी स्वच्छतेची जबाबदारी ही केवळ प्रशासनाची नसून प्रत्येक नागरिकाची असल्याचे सांगितले. शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. युवा नेते करण येंड्रलवार यांनीही स्वच्छता मोहिमेत युवकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करत स्वच्छता हीच खरी सेवा असल्याचे मत व्यक्त केले. या मोहिमेअंतर्गत शहरातील विविध प्रभागांमध्ये स्वच्छता पथकांमार्फत रस्ते, नाल्या, सार्वजनिक ठिकाणे तसेच कचरा साचणाऱ्या भागांची विशेष स्वच्छता करण्यात येणार आहे. तसेच नागरिकांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. कार्यक्रमाला मुख्याधिकारी मुगाजी काकडे, कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव, शिवसेना गटनेते सुरज सातुरवार, प्रभाग क्रमांक १ च्या नगरसेविका तथा सभापती प्रीती धीरज नेम्मानीवार, नगरसेवक संतोष मरस्कोल्हे, नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानीवार, अश्विनी जागर्लावार, सभापती श्रीराम नेम्मानीवार, सामाजिक कार्यकर्ते मारोती मुनेश्वर, धीरज नेम्मानीवार तसेच शिवसेनेचे संतोष येलचलवार, राजेश जोशी आणि नवनिर्वाचित नगरसेवक प्रशांत कोरडे यांची उपस्थिती होती.

## एस.आय.आर प्रक्रियेस खेड तालुक्यात ५२ टक्के नागरिकांचा प्रतिसाद

### उर्वरित नागरिकांनी मॅपिंग करून घेण्याचे प्रांताधिकारी अनिल दौंडे यांचे आवाहन



राजगुरुनगर : (स. गांवकरी)

भारतीय निवडणूक आयोगातर्फे राबविण्यात येत असलेल्या एस.आय.आर उपक्रमाला खेड तालुक्यातील ५२ टक्के नागरिकांनी मॅपिंग केली असल्याची माहिती प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी दिली.


बेलो (केंद्रस्तरीय मतदार अधिकारी) मार्फत करण्यात येत असलेल्या एस.आय.आर ( विशेष सखोल पूर्णतापसणी)पूर्व तयारी सुरू झाली असून प्रत्यक्ष अंमलबजावणी जून महिन्यामध्ये होणार असल्याचे दौंडे यांनी स्पष्ट केले. एस.आय.आर अंतर्गत २००२ मधील मतदार यादीतील नावांची २०२४ मधील नावांशी सांगड घालून मॅपिंग केले जात आहे. ज्या व्यक्तींची नावे २००२ च्या यादीत नसतील, त्यांना 'प्रोजेनी' म्हणून पालकांचा पुरावा सादर करावा लागणार आहे. या प्रक्रियेमुळे मतदार यादीतील दुबार नावे, मृत व्यक्तींची नावे कमी होऊन नवीन पात्र मतदारांची नावे समाविष्ट होण्यास मदत होणार आहे, परिणामी मतदार यादी अधिक अचूक व पारदर्शक होईल. मात्र, ज्यांचे मॅपिंग झालेले नाही त्यांनी शासनाने निश्चित केलेले रहिवासी पुरावे सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांचे नाव मतदार यादीतून वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. मतदार यादीतील शुद्धीकरणासाठी निवडणूक आयोग मार्फत राबविल्या जाणाऱ्या या प्रक्रियेवर मॅपिंग करून घेण्यासाठी शासनाने शाळेतील शिक्षक,नगरपरिषद कर्मचारी,कृषी अधिकारी,महसूल अधिकारी,ग्रामपंचायत कर्मचारी यांची नेमणूक करून त्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले होते.तरीही एस.आय.आर प्रक्रिया किचकट आणि या प्रक्रियेवर नेमलेल्या केंद्रस्तरीय मतदार अधिकारी अर्थात बेलो यांना डोकेदुखी झाल्याने स्थानिक नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते यांच्या मदतीने ही प्रक्रिया संथगतीने राबविताना केंद्रस्तरीय मतदार अधिकारी(बेलो) दिसत आहे.

या प्रक्रियेसाठी शिक्षक, नगरपरिषद कर्मचारी, कृषी व महसूल विभागातील अधिकारी तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तरीही प्रक्रिया काहीशी किचकट असल्याने आणि बेलो अधिकाऱ्यांवर ताण वाढल्याने काम संथगतीने सुरू असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक नगरसेवक व सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने ही मोहीम पुढे नेली जात आहे.

खेड तालुक्यातील सुमारे साडेतीन लाख मतदारांपैकी केवळ ५२ टक्के नागरिकांनी मॅपिंग पूर्ण केले असून उर्वरित नागरिकांनी लवकरात लवकर पुढे येऊन किंवा संबंधित बेलो अधिकाऱ्यांशी संपर्क साधून प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन प्रांताधिकारी अनिल दौंडे यांनी केले आहे. तसेच या उपक्रमाबाबत अधिक जनजागृती करण्याची गरजही व्यक्त होत आहे.

# त्या वाळू तस्कऱ्यावर प्रशासनाची अद्याप कार्यवाही नाही

**स्थानिक प्रशासनाच्या आशीर्वादाने हुंनगुंदयात वाळूचे अवैध साठे**



बिलोली : (स. गांवकरी)

बिलोली तालुक्यातील मौ. हुंनगुंदा येथील शासकीय डेपोमधील जमा असलेला १ हजार ५८१ ब्रास वाळूसाठा स्थानिक प्रशासनाच्या आशीर्वादाने येथील वाळू तस्करांनी तो पूर्णपणे साफ केला आहे.परंतु संबंधित तलाठी, मंडळाधिकारी यांनी त्याठिकाणची फक्त ८१ ब्रासच वाळू चोरीस गेल्याची फिर्याद दाखल केली. आणि १ हजार ५०० ब्रास शिल्लक दाखवून त्या तस्करास पाठीशी घातले जात आहे. यामुळेच त्या तस्करावर प्रशासनाकडून अद्याप कार्यवाही होत नाही. मागील काळात घरकुल लाभार्थ्यांसह मागेल त्याला सहज वाळू उपलब्ध व्हावी व अवैध वाळू उपस्यावर आळा बसावा यासाठी शासन स्तरावरून शासन धोरणाचे तालुक्यात वाळू डेपोची मिर्मिती करण्यात आली, त्यानुसार मौ. हुंनगुंदा येथे अशा डेपोची मिर्मिती करण्यात आली होती. परंतु हे धोरण प्रशासन व ठेकेदाराच्या दृष्टीकोनातून कुछ कामी ठरले आहे.कारण यात शासनाला मसूल तर लाभार्थ्यांना वाळू मिळणे सोयीसकर पडूलागले पण यात ठेकेदार व तालुक्यापासून ते जिल्ह्यातील प्रशासनाच्या आर्थिक नुकसानीचे ठरले आहे. यामुळे हे धोरण दिलेल्या कालावधीच्या आताच संपूष्टात आले आहे. यामुळे डेपोतील जमा असलेला १ हजार ५८१ ब्रास वाळूसाठा हा तालुका महसूल प्रशासनांनी ताब्यात घेतला होता. पण येथील वाळू तस्करांनी संबंधित तलाठी, मंडळाधिकारी व पोलीस प्रशासनाच्या आशिर्वादाने हा वाळूसाठा अनेक हायवा, ट्रॅक्टरच्या सह्याने पूर्णपणे चोरूस नेला होता, या ठिकाणी एकही ब्रास वाळू शिल्लक नसताना या सज्जाचे तलाठी, मंडळाधिकारी यांनी १५८१ पैकी फक्त ८१ ब्रास चोरीस गेल्याची फिर्याद दाखल करून त्या ठिकाणी १५०० ब्रास वाळूसाठा शिल्लक असल्याचा बनावट अहवाल वरिष्ठाकडे सादर केला, त्या आधारे त्या साठ्याचा दि.३० सप्टेंबर २०२५ रोजी लिलाव करण्यात येऊन जवळपास २२०० रुपये प्रतिब्रास प्रमाणे तो वाळूसाठा संबंधित लिलाव धारकाला देण्यात आला . पण याला सात महिन्यांचा कालावधी उलटला असलातरी सदरील लिलावाची रक्कम अद्याप भरण्यात आलेली नाही. परंतु त्याउलट एकही ब्रास वाळूसाठा नसलेल्या त्याच ठिकाणी नदीपात्रातून वाळूचा अवैध उपसा करून शेकडो ब्रास वाळूचा साठा करण्यासाठी महसूल प्रशासनाकडून मुबा देण्यात आली.

याबद्दल शासन दरबारी अनेक तक्रारी करूनही त्या वाळू तस्करावर अद्याप कार्यवाही करण्यात येत नाही.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# थोडक्यात पण महत्वाचे




## भोकर ग्रामीण रुग्णालयात महाराष्ट्र दिन साजरा; सेवापूर्ती सत्कार

भोकर (स. गांवकरी) : महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामीण रुग्णालय भोकर येथे उत्साहपूर्ण वातावरणात ध्वजारोहण समारंभ पार पडला. वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रताप चव्हाण यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आरोग्य निरीक्षक सत्यजीत टिप्रेसवार यांनी तंबाखूमुक्तीची शपथ वाचून दाखवली, तर सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली. रुग्णालयातील सहाय्यक अधीक्षक संजय देशमुख यांच्या सेवापूर्तीचा सत्कार समारंभही आयोजित करण्यात आला. देशमुख यांनी ३२ वर्षे आरोग्य विभागात प्रामाणिकपणे सेवा बजावत कनिष्ठ लिपिक ते सहाय्यक अधीक्षक असा उल्लेखनीय प्रवास पूर्ण केला. दि. ३० एप्रिल रोजी ते नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वतीने त्यांना भेटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी डॉ. प्रताप चव्हाण, डॉ. अनंत चव्हाण, डॉ. बाळासाहेब बिऱ्हाडे, डॉ. नितीन कळसकर, डॉ. सविता कांबळे, डॉ. सागर रेड्डी, डॉ. महेश मुंगळकर, डॉ. मंगेश पवळे, सत्यजीत टिप्रेसवार व गंगामोहन शिंदे यांनी मनोगत व्यक्त करून देशमुख यांच्या कार्याची प्रशंसा केली. कार्यक्रमाचे नियोजन प्रल्हाद होळगे, राजेश कल्याणकर, मनोज पांचाळ व संदीप ठाकूर यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. विजयालक्ष्मी किनिकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन गंगामोहन शिंदे यांनी केले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



## पोलिस अधीक्षक पदी डी एस स्वामी

नाशिक (स. गांवकरी) : वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याच्या नुकत्याच बदल्या गृह विभागाने केल्या आहेत . नाशिक पोलिस अधीक्षक असलेले बाळासाहेब पाटील यांची बदली मुंबई शहर उपायुक्त म्हणून झाली आहे. त्याच्या जागी ठाणे ग्रामीण चे पोलिस अधीक्षक डॉ डी एस स्वामी यांची बदली झाली .त्यांनी काल बाळासाहेब पाटील याच्या कडून नुकताच पदभार स्वीकारला. याआधी स्वामी हे नाशिक शहरात उपायुक्त होते .त्यावेळी त्यांनी कायदा सुव्यवस्था राखत त्यांचे सिंगम स्टाईल बघतली होती. नाशिक ग्रामीण अधीक्षक म्हणून नियुक्ती झाल्याने आगामी कुंभमेळा हा महत्वाचा असणार आहे.



## महात्मा गांधी विद्यालयाचा बारावीचा निकाल ९९.६८ टक्के

मंचर (ता. आंबेगाव) (स. गांवकरी) : रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयाचा इयत्ता बारावी (उच्च माध्यमिक) बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून विद्यालयाने ९९.६८ टक्के इतका उल्लेखनीय निकाल नोंदवत यशाची परंपरा कायम राखली आहे. या उल्लेखनीय यशामुळे विद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निकाल जाहीर होताच यशस्वी विद्यार्थ्यांचा विद्यालयात सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. प्राचार्य नितीन बाणखेले यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हा यशस्वी निकाल शक्य झाल्याचे प्राचार्यांनी यावेळी सांगितले. शास्त्र शाखेत शेटे आर्यन सुनील याने ८३.३३ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. भागडे चतुर्थी राजेंद्र हिने ८१.६७ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला, तर कोरडे आर्यन मारुती याने ७९.६७ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य शाखेत वाकचौरे नैतिक संदीप याने ८६.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला. धुमाळ स्नेहल संजय हिने ८५.५० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर गुंड वेदिका संजय हिने ८४.३३ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक संपादन केला. विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल स्थानिक स्कूल कमिटी सदस्य, ग्रामस्थ तसेच विद्यालय प्रशासनाने विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख प्रा. कैलास एरंडे, प्रा. संतोष गाडेकर, प्रा. जयश्री मुळे, प्रा. संगीता गवारी, प्रा. संचिता भिडवे, प्रा. सुवर्णा येंधे व प्रा. श्वेता महाडिक उपस्थित होते. विद्यालयाच्या या यशामुळे संस्थेचा व परिसराचा शैक्षणिक दर्जा अधिक उंचावल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## आ. अमोल जावळे यांच्या प्रयत्नाने डायलिसिस सेंटरचे उद्घाटन



रावेर (स. गांवकरी) : रावेर येथील ग्रामीण रुग्णालय मध्ये महाराष्ट्र दिनी डायलिसिस सेंटरचे ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. रावेर शहरात रुग्णांची गरज लक्षात आल्याने गोरगरीब जनतेला डायलिसिस करण्यासाठी जळगाव किंवा बुऱ्हानपूर जावे लागत होते व मोठ्या प्रमाणावर पैसा खर्च करावा लागत होता परंतु डायलिसिस सेंटर रावेर येथेच झाल्यास जनतेची सोय होईल या उदात्त हेतूने आमदार अमोल जावळे यांनी रावेर ग्रामीण रुग्णालयात डायलिसिस सेंटर मंजुरीसाठी अथक प्रयत्न केले त्याला यश आल्याने महाराष्ट्र दिनी संपूर्ण महाराष्ट्रात या सेंटर चे ऑनलाईन लाईन लोकार्पण राज्याचे आरोग्य मंत्री ना प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. तरी मान्यवरांनी आपल्या भाषणातून आरोग्य मंत्री आणी आ अमोल जावळे यांचे आभार मानले. ऑनलाइन उद्घाटन झाल्यानंतर स्थानिक कार्यक्रम पार पडला.

# ऐतिहासिक भिडेवाडा चित्ररथाचे भव्य मिरवणुकीने स्वागत

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंती महोत्सवा निमित्ताने दि ११ एप्रिल २०२६ ते दि १० एप्रिल २०२७ या कलावधी पर्यंत केंद्र व राज्य सरकारच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यानिमित्ताने अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली, कार्याध्यक्ष माजी खासदार समीर भुजबळ, आमदार पंकज भुजबळ यांच्या संकल्पनेतून महात्मा फुले यांच्या जीवनावर आधारित चित्ररथाची निर्मिती करण्यात आली आहे महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने हा




चित्ररथ महाराष्ट्रभर फिरवण्यात येत आहे. या चित्ररथामध्ये क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, ज्ञानज्योती क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे अर्धाकृती पुतळे तसेच महात्मा फुले यांचा पूर्णाकृती पुतळा आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. या सोबतच समतेचे महामेरू छत्रपती शाहू महाराज आणि घटनेचे शिल्पकार महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेही पुतळे चित्ररथात साकारण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे महात्मा फुले लिखित पुस्तक व पेन या ज्ञानाच्या प्रतिकांची प्रभावी मांडणी करून सभास प्रबोधनाचा संदेश दिला जात आहे. तसेच यामध्ये भिडे वाड्याची प्रतिकृतीदेखील साकारण्यात आली आहे.

हा चित्ररथ समता बंधुता न्याय आणि ज्ञान या मुद्यांचा प्रसार करत महाराष्ट्रातील गावोगावी व शहरा-शहरांमध्ये पोहोचत आहे. प्रत्येक ठिकाणी शहरातील महामानवांच्या पुतळ्यांना पुष्पहार टाकून अभिवादन करण्यात येत असून सामाजिक एकात्मतेचा संदेश दिला जात आहे. अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद जिल्हा नांदेड च्यावतीने या चित्ररथाचे नांदेड शहरात दि १ मे रोजी भव्य मिरवणूक, आतिषबाजी, बँड वाद्यासह करण्यात आली होती. या चित्ररथाची सुरुवात महात्मा बसवेश्वर पुतळा नविन कौठा येथे फटाक्यांची आतिषबाजी सह बँड वाद्यासह त्यांच्या विचारांना अभिवादन करून मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर पुढे छत्रपती शिवाजी महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांना अभिवादन करून महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पुतळ्यासमोर मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतिषबाजी करत बँडवाद्यासह स्वागत करण्यात आले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष ॲड. संघरत्न गायकवाड, उपाध्यक्ष शिद्धोधन ढवळे, सरचिटणीस अनिल गायकवाड, सचिव रवि बहादुरे, उत्तम कांबळे, फिरोज पटेल, सचिन व्यवहारे, लखन वाघमारे, नितीन कांबळे, लोहा माजी नगराध्यक्ष प्र पंचशील कांबळे, शिवसेनेचे युवा शहर प्रमुख सामाजिक न्याय विभाग ॲड. धम्मपाल कदम, सामाजिक कार्यकर्ते रमेश सोनाळे, भीम कायदा संघटनेचे जिल्हाध्यक्ष विलास गजभारे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे सरचिटणीस एकनाथ वाघमारे, शेख सोहेल, आनंद जाधव, शेख इरफान, शुभम राऊत यांच्यासह शेकडो पदाधिकारी, कार्यकर्ते व शिव, फुले, शाहू, आंबेडकर प्रेमी उपस्थित होते.

## शिवाजी खंडागळे यांची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

भोकर : (स. गांवकरी)

तालुक्यातील अतिदुर्गम व लहानशा बाचोटीकॅम्प गावातील युवक शिवाजी खंडागळे यांनी पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर निवड मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून केलेल्या या यशामुळे संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. बाचोटीकॅम्प भोकरपासून १४ किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. अवघ्या ५० ते ६० घरांचे हे छोटेसे खेडे ताटकळवाडी गट ग्रामपंचायत अंतर्गत येते. गावाला महसुली गावाचा दर्जा नसून चोहोबाजूंनी ते जंगलाने वेढलेले आहे. कोरडवाहू शेती व रोजगाराच्या मर्यादित संधीमुळे येथील नागरिकांना उपजीविकेसाठी स्थलांतर करावे लागते. गावातील सर्वच कुटुंबे अनुसूचित जाती (मातंग समाज) प्रवर्गातील आहेत. याच गावातील रामा भिवाजी खंडागळे हे गवंडी काम करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आपल्या मुलांना शिक्षण देतात. त्यांचा मुलगा शिवाजी खंडागळे हा



सन २०१३ मध्ये महाराष्ट्र पोलीस दलात पोलिस शिपाई म्हणून रुजू झाला. मात्र, पोलीस उपनिरीक्षक होण्याचे स्वप्न मनात बाळगून त्यांनी सतत प्रयत्न सुरू ठेवले. MPSC मार्फत होणाऱ्या परीक्षांमध्ये अनेकदा अपयश आले तरी त्यांनी जिद्द सोडली नाही. अखेर सन २०२३ मध्ये खात्यांतर्गत पिएसआय पूर्व व मुख्य परीक्षेत त्यांनी यश मिळवले. त्यानंतर दोन वर्षांनी झालेल्या शारीरिक चाचणीतही उत्कृष्ट गुण मिळवत त्यांनी चांगल्या क्रमांकासह यश मिळवले. नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात ६१५ उमेदवारांच्या यादीत त्यांचा २१४ वा क्रमांक लागला आहे.

## क्रांती डोंबे तहसीलदार गजानन शिंदे याना निलंबित करा

नांदेड : (स. गांवकरी)

नाम मात्र शासकिय परवानगीच्या नावाखाली बिलोली तालुक्यातील मांजरा नदी पात्रातील अवैध रेती उपसा प्रकरणी विधिमंडळ अंदाज समितीच्या सर्जिकल स्ट्राईकच्या धाडीत जेशिबीचा सरासपणे वापर करुन धक्कादायक बेहिशोबी अवैध रेती साठे व दिवस रात्र अवैध वाहातुकीस पाठबळ देणाऱ्या जबाबदार उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे व तहसिलदार गजानन शिंदे याना निलंबित करण्याचे समितीने दिलेल्या निर्देशाची अमलबजावणी करा यासह अन्य विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते साईनाथ पांढरे व आशोक हिवराळे यांनी महाराष्ट्र दिनी ०१ मे पासुन विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे अमरण उपोषणास बसले आसुन आज उपोषणाचा चौथा दिवस आसुन प्रकृती चिंताजनक झाली आहे. गेल्या ०९ एप्रिल रोजी बिलोली तालुक्यातील मांजरा नदी पात्रातील सगरोळी, गंजगाव, येसगी या रेती घाटावर महाराष्ट्र विधिमंडळ अंदाज समितीच्या सर्जिकल स्ट्राईकच्या धाडीत सदरील घाटावर्ती




ठिकठिकाणी जेसीबीच्या साह्याने साठवलेली रेतीचे बेमाप ठिगारे व दिवस रात्र शेकडो वहानातुन होणारी अवैध रेती वाहतूक सदर समितीच्या निदर्शनास आली प्रशासकीय अधिका-याचा हा खुले आम आर्थिक साठ्या लोटयांचा घोडे बाजारांचा खेळ एकंदरीत या अवैध परस्थितीचा समितीला जबर धक्काच बसला. या लुटमारीला पाठबळ देणारे जबाबदार बिलोली उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे व तहसीलदार गजानन शिंदे यांना दोषी ठरवून निलंबित करण्याचे व संबधित ठेकेदारावर कार्यवाही करण्यांचे जिल्हाधिकाऱ्यांना समितीचे अध्यक्ष आमदार अर्जुन खोतकर यांनी निर्देश दिले. जवळपास एक महिना होत आला पण समितीच्या निर्देशास अधिका-यांकडुन केराची टोपली ? सत्तेचा दबाव ? अर्थिक वाटाघाटी? ने जिल्ह्यातील चर्चेत वातावरण ढवळुन निघत आहे. याबाबत वरीष्ठ पातळीवरुन देखील अद्यापही कुठलीच कार्यवाहीची हालचाल झाली नसल्याने तसेच यापुर्वी देखील अनेक वेळा सदरील उपोषणकर्ते वरीष्ठाकडे तक्रारी देऊन देखील तक्रारीची दखल घेतली गेली नसल्याने तसेच समितीचे निर्देश देखील संशयाच्या भोव-यात आडकल्याने या विषयाला वाच्छता फोडण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते साईनाथ पांढरे व अशोक हिवराळे यांनी अमरण उपोषणाचे हत्यार उपसले आसुन त्यांच्या या प्रमुख मागणीसह घरकुल लाभार्थ्यांना तात्काळ पाच ब्रास मोफत रेती देणे. तसेच घरकुल लाभार्थ्यांकडुन पाच हजार रुपये वसुल करणा-या संबंधीत ठेकेदारा विरोधात गुन्हे दाखल करणे, उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे व तहसिलदार गजानन शिंदे यांच्या संपतीची एस.आय.टी मार्फत चौकशी करणे या मागण्या घेऊन सामाजिक कार्यकर्ते पांढरे व हिवराळे हे महाराष्ट्र दिनी ०१ मे पासुन छत्रपती संभाजीनगर येथे विभागीय आयुक्त कार्यालया समोर अमरण उपोषणास बसले असून आज रविवार हा उपोषणाचा तिसरा दिवस आसुन या उपोषणाची नव्याने रुजू झालेले कर्तव्यदक्ष विभागीय आयुक्त जी. श्रीकांत हे या प्रकरणी तडकाफडकी निर्णय घेतील का? याकडे संपुर्ण नांदेड जिल्ह्याचे लक्ष लागुन आहे.तर समितीच्या नाकावर ठेचुन प्रशासनाच्या अशिर्वादाने आज पावे जेशिबी मशिनने उपसा व हजारो वहानाने दिवस रात्र अवैध रेती वहातुक चालुच आहे.दुसरी कडे मात्र चौथ्या दिवशी उपोषण कर्त्यांची प्रकृती चिंता जनक झाली आहे.

## हळद्याच्या जि.प. केंद्रीय शाळेत महाराष्ट्र दिन उत्साहात संपन्न

भोकर : (स. गांवकरी)

हळदा येथील जिल्हा परिषद केंद्रीय शाळेत महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी राष्ट्रीय थोर महापुरुषांच्या प्रतिमाचे पुजन झाले . केंद्रीय मुख्याध्यापक बालाजी गुट्टे यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

या प्रसंगी हळद्याचे सरपंच चंद्रकांत नागमोड, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माधवराव बोईनवाड, तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष भुजंगराव पाटील, चेअरमन दत्तराम अक्कलवाड, विलासराव किशवे, पोलीस पाटील नागनाथ आमेटवाड, उपसरपंच गजानन करपे, लक्ष्मण आरलवाड, ग्रामसेवक माधवराव ढगे, डॉ. मायावती गर्जे तसेच पत्रकार बालाजी नार्लेवाड व शिवाजी खांडरे यांसह सर्व अंगणवाडी ताई , गावातील कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात मुख्याध्यापक बालाजी गुट्टे यांनी प्रास्ताविकातून मागील शैक्षणिक वर्षातील विविध शालेय



उपक्रमांचा आढावा घेतला. पत्रकार बालाजी नार्लेवाड यांनी महाराष्ट्र दिनानिमित्त वर्गोन्नती झालेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मागील चार महिन्यांत शाळेत राबविण्यात आलेल्या 'सामान्यज्ञान विकास' या नवोपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या स्पर्धेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. उच्च प्राथमिक गटात कु. मेघा प्रभाकर करपे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर लखन शिवाजी खांडरे आणि जगदीश किशन गोरे यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. प्राथमिक गटात कु. रिसिका ज्ञानेश्वर मिनगूरवार हिने प्रथम क्रमांक मिळवला, तर धम्ममेधा आनंद डोंगरे आणि कु. काव्या शिवाजी खांडरे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला. विजेत्यांचा सन्मान पालक व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच, पुढील शैक्षणिक वर्षासाठी इयत्ता पहिली प्रवेशपात्र बालकांचे शालेय साहित्य व मिठाई देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पदवीधर शिक्षक मिलिंद जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन विनोद सोनटक्के यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पापेश्वर पुलकंटवार, सुजाता तिगोटे, वंदना इंगोले आणि बाबुमामा आयतोड यांनी परिश्रम घेतले.

## जिल्ह्यामध्ये प्लॉटिंग बाजाराला ब्रेक?

वसमत : (स. गांवकरी)

शहर व तालुक्यात गेल्या काही वर्षांत उसळलेल्या प्लॉटिंग बाजाराला आता स्पष्टपणे ब्रेक लागल्याचे चित्र समोर येत आहे. कोरोनानंतरच्या काळात प्रचंड वेगाने वाढलेल्या या व्यवसायात अल्पावधीतच मोठी तेजी आली होती. मात्र आता तीच तेजी ओसरत असून बाजार 'रिॲलिटी चेक'च्या टप्प्यात पोहोचल्याची चर्चा सुरू आहे.



■ आकाशाला भिडलेले दर आता खाली; गुंतवणूकदार 'वेट अँड वॉच' मोडमध्ये

पूर्वी 5 ते 6 लाखांत उपलब्ध असलेले प्लॉट साखळी व्यवहारांमुळे 16 ते 22 लाखांच्या घरात गेले. काही ठिकाणी तर प्रत्यक्ष मागणीपेक्षा दर कृत्रिमरीत्या फुगवल्याचेही बोलले जाते. शहरालगतच्या शेतीजमिनी मोठ्या प्रमाणावर खरेदी करून त्यांचे प्लॉटिंग करण्यात आले आणि 'झटपट नफा'च्या अपेक्षेने गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली. मात्र गेल्या काही आठवड्यांपासून बाजारातील समीकरणे झपाट्याने बदलताना दिसत आहेत. विक्रीसाठी प्लॉट उपलब्ध असले तरी खरेदीदार पुढे येत नसल्याचे वास्तव आहे. वाढलेले दर, आर्थिक ताण आणि भविष्यात दर आणखी खाली येण्याची शक्यता यामुळे ग्राहक 'वेट अँड वॉच'च्या भूमिकेत गेले आहेत. परिणामी व्यवहारांची गती लक्षणीयरीत्या मंदावली आहे.


रिअल इस्टेट क्षेत्रातील जाणकारांच्या मते, मागील तेजी ही मोठ्या प्रमाणावर सट्टेबाजी आणि अपेक्षांवर आधारित होती. आता बाजार स्वतःला संतुलित करत असून काही भागांत दर कमी करण्याची वेळ विक्रेत्यांवर आली आहे. तरीही खरेदीदारांचा प्रतिसाद अपेक्षेइतका मिळत नसल्याचेही स्पष्ट होत आहे.

# शिवणी तांड्यात 'ऑपरेशन क्रॅक डाऊन”

**अवैध हातभट्टी, रसायनयुक्त शिंदी व गुटखा माफियांवर पोलिसांचा मोठा प्रहार - किनवट परिसरात अशी कारवाई कधी ?**

किनवट : (स. गांवकरी)

किनवट तालुक्यातील शिवणी व शिवणी तांडा येथे नांदेड जिल्हा पोलिसांनी रविवारी (दि. 03 मे) पहाटे 'ऑपरेशन क्रॅक डाऊन” अंतर्गत राबविलेल्या व्यापक धडक (मास रेड) कारवाईमुळे अवैध हातभट्टी दारू, रसायन मिश्रित शिंदी आणि गुटखा व्यवसायावर मोठा घाव बसला आहे. अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या मोहिमेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून, अनेक वर्षांपासून बिनधास्तपणे सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यांना मोठा धक्का बसल्याचे चित्र आहे.



पहाटेच पोलिसांनी अचानक छापे टाकत कारवाईला सुरुवात केली. दुपारपर्यंत अखंड सुरू असलेल्या या मोहिमेत तब्बल १० अधिकारी व १०० पेक्षा अधिक पोलिस कर्मचाऱ्यांचा मोठा फौजफाटा सहभागी झाला होता. शिवणी व तांडा परिसर अक्षरशः पोलिस छावणीत परिवर्तित झाला होता. कारवाईदरम्यान हजारो लिटर रसायन मिश्रित अवैध हातभट्टी दारू व शिंदी जप्त करून तत्काळ नष्ट करण्यात आली. तसेच हातभट्टीसाठी साठवून ठेवलेले मोहफुलाचे शेकडो पोते जप्त करण्यात आले. या साठ्याचे प्रमाण इतके प्रचंड होते की जवळपास दोन ट्रॅक्टरभर मोहफुले पोलिसांनी जप्त केली. यावरून या अवैध व्यवसायाचे जाळे किती व्यापक पसरले आहे, हे स्पष्ट झाले. याशिवाय रसायनयुक्त शिंदी तयार करून विक्री करणाऱ्यांवर आणि गुटखा विक्रेत्यांवरही पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला. एका गुटखा तस्कराला ताब्यात घेण्यात आले असून, या संपूर्ण प्रकरणात ३० ते ४० जणांवर गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.


किनवट तालुक्यातील ग्रामीण व तांडा भागात अवैध हातभट्टी दारू, रसायन मिश्रित शिंदी आणि गुटखा विक्रीचा व्यवसाय गेल्या काही वर्षांत झपाट्याने वाढला आहे. हे धंदे केवळ कायद्याचे उल्लंघन करणारे नाहीत, तर ते थेट जनतेच्या जीविताशी खेळ करणारे आहेत. अशा प्रकारच्या रसायनयुक्त मद्यामुळे विषबाधा, अंधत्व आणि मृत्यूच्या घटनांची शक्यता कायम असते. या अवैध व्यवसायांमुळे तरुण पिढी व्यसनाधीन होत असून, अनेक कुटुंबे आर्थिक व सामाजिक अडचणीत सापडत आहेत. गुटखा सेवनामुळे कर्करोगासारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे, तर हातभट्टी दारूमुळे आरोग्य धोक्यात येत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ कायद्यापुरता मर्यादित नसून सामाजिक व आरोग्यविषयक गंभीर समस्या बनला आहे. शिवणी तांड्यातील ही कारवाई प्रभावी ठरली असली तरी, केवळ एकदाच कारवाई करून हा प्रश्न पूर्णतः सुटणार नाही. किनवट परिसरासह तालुक्यातील इतर भागांमध्येही अशाच प्रकारचे अवैध धंदे सुरू असल्याची चर्चा असून, पोलिसांनी नियमितपणे 'ऑपरेशन क्रॅक डाऊन” सारख्या मोहिमा राबविणे अत्यावश्यक आहे. सातत्यपूर्ण आणि नियोजनबद्ध कारवाईमुळेच या अवैध जाळ्याला आळा बसू शकतो. पोलिस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, त्यांच्या परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर धंद्यांची माहिती पोलिसांना द्यावी. स्थानिकांच्या सक्रिय सहभागामुळेच अशा मोहिमा अधिक यशस्वी होऊ शकतात. या कारवाईनंतर नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ होत असल्याचे दिसून येते. अवैध धंद्यांवर कायमस्वरूपी आळा घालण्यासाठी केवळ कारवाई पुरेशी नाही.

# थोडक्यात पण महत्वाचे



## एमओए दिनानिमित्त आठवडाभर जनजागृती उपक्रम

पुणे (स. गांवकरी) : महाराष्ट्र अस्थिरोग संघटना (एमओए) तर्फे 'एमओए दिन' निमित्त १ मे ते ७ मे २०२६ या कालावधीत राज्यभर विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हाडे, सांधे आणि मणक्यांच्या आरोग्याबाबत सर्वसामान्य नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. यंदाची संकल्पना "आपले गुडघे वाचवा, आपले मणके वाचवा, आपले हाडे वाचवा" अशी ठेवण्यात आली आहे. या उपक्रमांचा शुभारंभ पुण्यातील संचेती रुग्णालय येथे मान्यवर अस्थिरोग तज्ज्ञ आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झाला. यावेळी डॉ. पराग संचेती, डॉ. एन. जे. कर्णे, डॉ. प्रशांत टोनपे, डॉ. सचिन आबणे, डॉ. मुकेश धर्मा, डॉ. मनीष कुलकर्णी, डॉ. अतुल पाटील तसेच डॉ. शैलेश हडगांवकर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. कर्णे यांनी संघटनेच्या स्थापना दिनाचे महत्त्व अधोरेखित करत सांगितले की, २०१८ पासून १ मे हा दिवस 'एमओए दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने दरवर्षी १ ते ७ मे या कालावधीत राज्यभर विविध जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित केले जातात. या उपक्रमांद्वारे हाडांचे आरोग्य, सांध्यांचे विकार, मणक्यांचे आजार, हाडांची ठिसूळता, गुडघेदुखी व पाठदुखी यांचा प्रतिबंध तसेच निरोगी जीवनशैली याबाबत जनजागृती केली जात आहे. या आठवड्यात राज्यातील विविध ठिकाणी जनजागृती व्याख्याने, मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरे, हाडांची घनता तपासणी, सार्वजनिक संवाद कार्यक्रम आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. दरम्यान, संचेती रुग्णालय येथे आयोजित मोफत तपासणी शिबिरात ५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदविला.



## बंधन इनोव्हेशनची २ वर्षे पूर्ण; नाविन्याधारित गुंतवणुकीवर भर कायम

पुणे (स. गांवकरी) : Bandhan Innovation Fund या गुंतवणूक योजनेने नाविन्याधारित वाढीवर लक्ष केंद्रित करत दोन वर्षांचा टप्पा पूर्ण केला आहे. देशाच्या भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या आणि नाविन्यतेच्या बळावर प्रगती करणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करण्यावर या योजनेचा भर आहे. विशिष्ट उद्दिष्टाने सुरू करण्यात आलेल्या या योजनेत संशोधन व विकासावर मोठा खर्च करणाऱ्या, उच्च कौशल्य असलेल्या मनुष्यबळाचा वापर करणाऱ्या, वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने किंवा सेवा देणाऱ्या तसेच मजबूत प्रतिमा असलेल्या उद्योगांमध्ये गुंतवणूक केली जाते. पारंपरिक आर्थिक चक्रांपेक्षा नाविन्यतेच्या चक्रावर आधारित आणि वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांतील संधी शोधण्यावर भर दिला जातो. याबाबत प्रतिक्रिया देताना योजनेचे व्यवस्थापक Pratik Poddar यांनी सांगितले की, "दीर्घकालीन स्पर्धात्मकता मिळवण्यासाठी नाविन्यता हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरत आहे. जे उद्योग सातत्याने नवे प्रयोग करतात, ते अल्पकालीन आर्थिक बदलांचा परिणाम कमी करत उत्पादनक्षमता वाढवू शकतात, बाजारातील हिस्सा वाढवू शकतात आणि नवीन बाजारपेठाही निर्माण करू शकतात." भारतामध्ये अभियंते, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ आणि उद्योजक यांच्या माध्यमातून नवीन उत्पादने व सेवा विकसित होत असून, याच क्षेत्रांमध्ये भविष्यातील आर्थिक नेतृत्व घडत आहे. अशा उद्योगांमध्ये त्यांच्या प्रारंभीच्या टप्प्यात गुंतवणूक करणे ही गुंतवणूकदारांसाठी मोठी संधी असल्याचेही त्यांनी नमूद केले. ही योजना अशा गुंतवणूकदारांसाठी उपयुक्त मानली जाते, जे दीर्घकालीन गुंतवणुकीस तयार असून अधिक जोखीम स्वीकारण्याची क्षमता ठेवतात. तसेच, विविधता राखण्यासाठी इतर मोठ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक करणाऱ्या योजनांना ही योजना पूरक ठरू शकते. तिसऱ्या वर्षात पदार्पण करताना, नाविन्यतेच्या आधारे शाश्वत मूल्य निर्माण करणाऱ्या उद्योगांमध्ये गुंतवणूक सुरू ठेवणे आणि देशाच्या आर्थिक बदलांशी सुसंगत राहणे हेच या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट राहणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

## फोर्स मोटर्सची झेप; आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये सर्वोच्च महसूल व नफा

पुणे (स. गांवकरी) : Force Motors या अग्रगण्य वाहन निर्मिती कंपनीने आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आतापर्यंतचा सर्वोच्च महसूल आणि नफ्याची नोंद केली आहे. ३१ मार्च २०२६ रोजी संपलेल्या तिमाही आणि संपूर्ण वर्षाचे आर्थिक निकाल जाहीर करताना कंपनीने सातत्यपूर्ण कामगिरी, खर्च नियंत्रण आणि सर्व उत्पादन विभागांतील वाढ यामुळे ही ऐतिहासिक कामगिरी साध्य झाल्याचे स्पष्ट केले. कंपनीने वर्षभरातील प्रत्येक तिमाहीत स्थिर प्रगती नोंदवली असून, व्यवसायातील शिस्तबद्धता आणि नियोजनबद्ध विस्तार यामुळे एकूण आर्थिक स्थितीत भक्कम सुधारणा झाली आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ हे कंपनीच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरले असल्याचेही नमूद करण्यात आले. देशांतर्गत बाजारपेठेत कंपनीने उल्लेखनीय कामगिरी करत मागील वर्षाच्या तुलनेत एकूण घाऊक विक्रीत सुमारे २० टक्के वाढ नोंदवली. व्हॅन विभागात कंपनीने आपले वर्चस्व कायम राखत सुमारे ७० टक्क्यांहून अधिक हिस्सा टिकवून ठेवला आहे. प्रीमियम प्रवासी वाहतूक विभागात 'अर्बेनिया' या मॉडेलने शंभर टक्क्यांपेक्षा जास्त वाढ नोंदवून महत्त्वाची झेप घेतली आहे.

## इंदुरीचे माजी सरपंच किसनराव नागुजी देशमुख यांचे निधन!



इंदुरी (स. गांवकरी) : इंदुरी गावचे माजी सरपंच किसनराव नागुजी देशमुख यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्षे होते. त्यांच्या निधनाने इंदुरी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. किसनराव देशमुख यांनी गावच्या सरपंच पदासह दूध संस्थेचे चेअरमन पद भूषवले होते. तसेच ते बस्तीराम सारडा यांच्या उंट बिडी उद्योग समूहात मॅनेजर म्हणून कार्यरत होते. इंदुरी येथील सती तारामती मातेच्या मंदिराच्या उभारणीत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले निवृत्त शिक्षक शांताराम देशमुख, माजी उपसरपंच सुभाष देशमुख, माजी प्राचार्य रमेश देशमुख, तसेच नातू जलसंपदा अभियंता अक्षय देशमुख, सचिन कृषी सेवा केंद्राचे संचालक सचिन देशमुख, इंजि. आकाश देशमुख असा परिवार आहे. इंदुरी येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

# पोलीस पाटलाची पत्रकाराला 'कायमचा बंदोबस्त' करण्याची धमकी; गुन्हा दाखल!

### अहिल्यानगर जिल्ह्यातील धक्कादायक प्रकार, अधिकाराचा गैरवापराचा आरोप!

पुणे : (स. गांवकरी)



देवस्थान ट्रस्टविरोधात बातम्या प्रसिद्ध केल्याच्या कारणावरून पत्रकाराला फौजदारी गुन्ह्यात अडकविण्याची व "कायमचा बंदोबस्त" करण्याची लेखी धमकी दिल्याप्रकरणी पोलीस पाटील गोपीनाथ बाळासाहेब ढगे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अकोले तालुक्यातील कळस बु. येथील देवस्थान ट्रस्टच्या कारभाराविरोधात पत्रकार आशिष ढगे यांनी आपल्या न्यूज पोर्टलवर अनेक बातम्या प्रसिद्ध केल्या होत्या. या बातम्यांमध्ये विश्वस्त मंडळाने स्वतःलाच कायमस्वरूपी विश्वस्त ठेवण्याचा तसेच रिक्त जागा भरण्याचा अधिकार स्वतःकडे ठेवण्याच्या निर्णयाचा उल्लेख करण्यात आला होता. या बातम्यांमुळे गावकऱ्यांमध्ये जनजागृती झाल्याचा दावा करण्यात येत असताना, ट्रस्टचे सचिव तथा कामगार पोलीस पाटील गोपीनाथ ढगे यांनी प्रसिद्धीपत्रक काढून पत्रकार आशिष ढगे यांच्यावर ब्लॅकमेलिंगचे आरोप केले. तसेच बातम्या थांबविल्या नाहीत तर फौजदारी गुन्ह्यात अडकविण्याची आणि गावकऱ्यांच्या मदतीने "कायमचा बंदोबस्त" करण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणी पत्रकार आशिष ढगे यांच्या फिर्यादीवरून दक्षिण म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक 719/2026 अंतर्गत बीएनएस कलम 351(4) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक आर. एम. घुले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार रेंगडे करीत आहेत. दरम्यान, गावातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी असलेल्या पोलीस पाटलानेच आपल्या पदाचा गैरवापर करून पत्रकाराला धमकावल्याचा गंभीर आरोप करण्यात येत आहे.

पत्रकार आशिष ढगे यांनी, "माझ्या जीवितास धोका असून या प्रकरणात न्यायालयातही दाद मागणार आहे. संबंधितांवर तातडीने कठोर कारवाई व्हावी," अशी मागणी केली आहे.

# जेष्ठ कलाकारांसाठी कार्य कौतुकास्पद; जागा देण्याची तयारी – रविंद्र चव्हाण



मुंबई : (स. गांवकरी)

चित्रपट क्षेत्रातील जेष्ठ कलाकारांच्या समस्या सोडवण्यासाठी कार्यरत असलेल्या कलाकार कल्याण संस्थेचे काम अत्यंत कौतुकास्पद असल्याचे मत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केले. जेष्ठ कलाकारांसाठी कोकणातील सावंतवाडी परिसरात स्वतःची एक एकर जागा देण्याची तयारी त्यांनी दर्शवली. जेष्ठ कलाकारांच्या सन्मानार्थ आयोजित समारंभात मान्यवर कलाकारांच्या छायाचित्रांसह माहितीफलकाचे उद्घाटन चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी चित्रपट क्षेत्रातील अनेक दिग्गज कलाकारांच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना चव्हाण म्हणाले की, कलाकारांचा एक ठराविक प्रसिद्धीचा काळ असतो; मात्र तो ओसरल्यानंतर अनेकांकडे दुर्लक्ष होते. अशा वेळी त्यांना दैनंदिन जीवनात विविध अडचणींचा सामना करावा लागतो. हजारो कलाकार आणि या क्षेत्रातील कामगारांना सामाजिक आयुष्यात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असल्याची माहिती त्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या समस्या सोडवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याशी चर्चा करून मार्ग काढण्याचा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## जुन्नर तालुक्याचा बारावीचा सरासरी निकाल ९१.४९ टक्के

ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ३६ कनिष्ठ महाविद्यालयांचा बारावीचा सरासरी निकाल ९१.४९ टक्के लागला. गतवर्षीच्या तुलनेत सरासरी निकालात १.७१ टक्के घट झाली. निकालात मुलींनी बाजी मारली तर सात शाळा शंभर नंबरी ठरल्या आहेत. निकालात मुलींची बाजी - २ हजार २९७ विद्यार्थ्यांपैकी २ हजार १९ (८७.८९ टक्के) विद्यार्थी उत्तीर्ण झाले. २ हजार २२८ विद्यार्थिनीं पैकी २ हजार १२१ (९५.१९ टक्के) विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या. निकालात विद्यार्थिनींनी बाजी मारली.

दृष्टिक्षेपात निकाल - परीक्षेत प्रविष्ट झालेल्या ४ हजार ५२५ विद्यार्थ्यांपैकी ४ हजार १४० विद्यार्थी उत्तीर्ण (९१.४९ टक्के) झाले. २१९ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले. ८५२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत तर २ हजार ३४९ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. सात कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल शंभर टक्के, १४ कनिष्ठ महाविद्यालयांचा निकाल नव्वद टक्क्यां पेक्षा जास्त लागला. सर्वात कमी ५५.१७ टक्के निकाल वडगाव कांदळी येथील हिंदमाता कनिष्ठ महाविद्यालयाचा लागला. तालुक्यात एका कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल शून्य टक्के लागला. तालुक्यातील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा सोमतवाडी, श्री जी. आर. गुंजाळ इंग्लिश मीडियम स्कूल आळेफाटा, हांडे देशमुख कॉलेज आळेफाटा, समर्थ कनिष्ठ महाविद्यालय बांगरवाडी, ज्ञानराज इंग्लिश मीडियम स्कुल आळे, अनुदानित माध्यमिक आश्रम शाळा सोमतवाडी, श्री शिवछत्रपती हायस्कूल जुन्नर (व्होकेशनल) या सात कनिष्ठ महाविद्यालयांचा सरासरी निकाल शंभर टक्के लागला.

# गांजा तस्करांवर पोलिसांचा घाव!

## धडक कारवाई; 2 लाखांचा मुद्देमाल जप्त, आरोपी गजाआड

हिंगोली : (स. गांवकरी)



जिल्ह्यात अमली पदार्थांच्या वाढत्या सावटावर सेनगाव पोलिसांनी जोरदार प्रहार करत कापडसिंगी परिसरात मोठी कारवाई उभी केली आहे. गोपनीय माहितीच्या आधारे टाकलेल्या छाप्यात पोलिसांनी गांजा तस्करी करणाऱ्या आरोपीला रंगेहात पकडत तब्बल 2 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या कठोर मार्गदर्शनाखाली पार पडली. लोणार रोडलगत संशयास्पद हालचाली करणाऱ्या इसमाला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याची ओळख नंदाजी मोहन चव्हाण (वय 36, रा. खुरामपूर, ता. लोणार, जि. बुलढाणा) अशी पटली. झडतीदरम्यान त्याच्या ताब्यातील पोत्यातून 4 किलो 800 ग्रॅम गांजा (किंमत अंदाजे 1,20,000 रुपये) सापडला. यासोबतच एक मोटरसायकल (70 हजार) व मोबाईल फोन असा एकूण 2 लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

या कारवाईत अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना, उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार केंद्रे यांच्या मार्गदर्शनासह सपोनि दीपक मस्के व त्यांच्या पथकाने महत्त्वाची भूमिका बजावली. महसूल, कृषी व फॉरेन्सिक टीमचाही सहभाग होता. हिंगोली पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, अमली पदार्थांचे सेवन, विक्री किंवा साठवणूक करणाऱ्यांना अजिबात पाठीशी घातले जाणार नाही. अशा गुन्ह्यांवर कठोरात कठोर कारवाई केली जाईल.

## लोकप्रिय मागणीनुसार iQOO Neo 10 नव्या रंगांत; 5 मेपासून विक्री

नवी दिल्ली : (स. गांवकरी)




iQOO कंपनीने आपल्या लोकप्रिय iQOO Neo 10 स्मार्टफोनचे अल्पाइन व्हाइट आणि अस्फाल्ट ब्लॅक हे दोन नवीन रंग पर्याय बाजारात सादर केले आहेत. ग्राहकांच्या वाढत्या मागणीच्या पार्श्वभूमीवर सादर करण्यात आलेले हे व्हेरिएंट्स आकर्षक डिझाइन आणि प्रीमियम लूकमुळे लक्ष वेधून घेत आहेत. हाय-परफॉर्मन्स रेसिंग कार्सपासून प्रेरित या रंगांमध्ये वेग आणि स्टाईलचा समतोल साधण्यात आला आहे. अल्पाइन व्हाइट हा रंग कूल-टोन फिनिशमुळे उठून दिसतो, तर अस्फाल्ट ब्लॅक हा रंग दमदार आणि स्टायलिश लूक पसंत करणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरतो.

या स्मार्टफोनची किंमत 8GB+256GB व्हेरिएंटसाठी ₹37,999 (प्रभावी ₹34,999) आणि 12GB+256GB व्हेरिएंटसाठी ₹42,999 (प्रभावी ₹40,999) इतकी ठेवण्यात आली आहे. विक्री 5 मे रोजी दुपारी 12 वाजल्यापासून iQOO च्या अधिकृत संकेतस्थळावर तसेच Amazon वर सुरू होणार आहे. iQOO Neo 10 मध्ये Snapdragon 8s Gen 4 प्रोसेसरसह Q1 सुपरकंप्यूटिंग चिप देण्यात आली असून, यामुळे 144 FPS पर्यंत स्मूथ गेमिंग अनुभव मिळतो. 2.5 दशलक्षांहून अधिक अँटूटू स्कोअरमुळे हा फोन आपल्या श्रेणीत वेगवान मानला जात आहे. 7000 $mm^2$ व्हेपर चेंबरसह प्रगत कूलिंग सिस्टीममुळे दीर्घकाळ वापरातही कार्यक्षमता टिकून राहते.

फोनमध्ये 6.78 इंचाची 1.5K AMOLED डिस्प्ले, 144Hz रिफ्रेश रेट आणि 5500 निट्स पीक ब्राइटनेस देण्यात आला आहे. याशिवाय, मिलिटरी-ग्रेड ड्रॉप रेझिस्टन्समुळे टिकाऊपणातही भर पडली आहे.

फोटोग्राफीसाठी 50 मेगापिक्सल Sony OIS प्रायमरी कॅमेरा, अल्ट्रा-वाइड लेन्स आणि 32 मेगापिक्सल फ्रंट कॅमेरा देण्यात आला आहे. 4K 60fps व्हिडिओ रेकॉर्डिंगसह सुपर नाईट मोड आणि पोर्ट्रेट मोड यांसारख्या सुविधा उपलब्ध आहेत. हा स्मार्टफोन Android 16 आधारित Origin OS 6 वर चालतो. 'मेक-इन-इंडिया' उपक्रमांतर्गत याचे उत्पादन ग्रेटर नोएडा येथील Vivo प्लांटमध्ये करण्यात येत असून, देशभरातील 700 हून अधिक सेवा केंद्रांद्वारे ग्राहकांना विक्रीनंतरची सेवा उपलब्ध होणार आहे.

## बारावी परिक्षेत जिया पठाण कर्जत तालुक्यात अव्वल

कर्जत : (स. गांवकरी)



■ विज्ञान शाखेत ९०.५० टक्के गुण ; जिद्दीने मिळविले ऐतिहासिक यश !

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता १२ वी परिक्षेचा निकाल शनिवारी जाहीर झाला. यात बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेत कर्जत येथील समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु.जिया अमजद पठाण हिने दैदिप्यमान यश संपादन केले आहे. जिया पठाण हिने ९०.५० टक्के गुण मिळवून विद्यालयातच नव्हे, तर संपूर्ण कर्जत तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळविला आहे. तिने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. जियाने सुरुवातीपासूनच अभ्यासात सातत्य ठेवले होते. तिच्या या यशाने समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. जियाने घेतलेल्या कठोर परिश्रमाचे फळ आज निकालाच्या रूपाने तिला मिळाले असून तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. जियाला लाभलेला शैक्षणिक वारसा तिच्या यशाचा पाया ठरला आहे. तिचे वडील अमजद पठाण हे डायनॅमिक इंग्लिश मिडियम स्कूलमध्ये शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. तर तिची आई रुबिया पठाण-शेख ह्या समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कर्जत येथेच जीवशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत आहेत.

# बुद्ध पौर्णिमेनिमित्त 'धम्म पहाट'ला पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पुणे : (स. गांवकरी)



तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंतीनिमित्त 'विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती, पुणे' यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'धम्म पहाट' कार्यक्रमाला पुणेकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शांतता, समता आणि बंधुभावाचा संदेश देणाऱ्या या सांस्कृतिक कार्यक्रमातून बुद्धविचारांचा जागर पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.

यंदा या कार्यक्रमाचे २० वे वर्ष असून, या विशेष प्रसंगी पुण्याच्या महापौर मंजूषा नागपुरे, उपमहापौर तथा कार्यक्रमाचे आयोजक परशुराम वाडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, बार्टीच्या सुचिता शिंदे, माजी नगरसेविका लता राजगुरू, नगरसेवक निलेश आल्हाट, रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, रमाई स्मारकाचे प्रमुख विठ्ठल गायकवाड, बबन जोगदंड, माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, समितीचे सचिव दीपक म्हस्के, मिलिंद अहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमात चेतन चोपडे यांच्या नेतृत्वाखालील कलापथकाने 'भीमा तुझ्या पाऊल खुणा' या भीमगीतांच्या सादरीकरणातून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. विकास साळवे, स्नेहल प्रधान यांच्यासह अन्य कलाकारांनी प्रभावी साथ दिली. 'प्रथम नमो गौतमा', 'तुज प्रथम हे नमन गौतमा', 'अनुसरा शिकवण बुद्धाची', 'नमो बुद्धाय म्हणे', 'प्रबुद्ध हो मानावा', 'पिंपळाच्या पानावर पाहिले चित्र गौतमाचे', 'करू भीमाचे चिंतन इथे', 'बुद्ध-फुले-आंबेडकर सांगू आम्ही', 'भीम भगवान माझ्या झोपडीत शान आहे' यांसारख्या गीतांनी वातावरण भारावून गेले. तसेच, राजर्षी शाहू महाराजांवरील 'माझा लोकराजा शाहू' या रॅपसह विविध गीतांनी कार्यक्रमाला वेगळी उंची दिली. उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या विनंतीवरून सादर करण्यात आलेले शाहीर वामनदादा कर्डक यांचे 'पाणी वाढ गं माय', 'लई नाय मागत', 'भर माझं इवलंसं गाडगं' या गीतांनी उपस्थितांच्या मनाला स्पर्श केला.

यावेळी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सांगितले की, गेली वीस वर्षे 'धम्म पहाट' या कार्यक्रमाचे सातत्याने आयोजन करण्यात येत आहे. महापौर मंजूषा नागपुरे यांच्या सहकार्याने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा नवीन पुतळा, रमाईंचा पुतळा आणि संविधान उद्यान यांसारखे प्रेरणादायी प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

सध्याच्या जागतिक परिस्थितीत अनेक ठिकाणी युद्धजन्य वातावरण असताना भारतात बुद्धविचारांवर आधारित संविधानामुळे शांतता टिकून आहे. जगाला शांततेचा मार्ग दाखविण्याचे सामर्थ्य बुद्ध विचारांमध्ये असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाची सुरुवात बुद्ध वंदनेने झाली, तर समारोप धम्म पालन गाथेने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपक म्हस्के आणि महेश अचिंतवार यांनी केले.

# थोडक्यात पण महत्वाचे

## ओतूर येथील गाढवेपटात नर बिबट जेरबंद



ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील गाढवेपट परिसरात स्थानिक ग्रामस्थांच्या मागणीनुसार वनविभागाने लावलेल्या पिंजऱ्यात रविवारी (दि. ३ मे) पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास अंदाजे ६ वर्षांचा नर बिबट जेरबंद झाल्याची घटना घडली आहे. घटनेची माहिती मिळताच ओतूरचे वनपरिक्षेत्र अधिकारी चैतन्य कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल विश्वनाथ बेले, वनमजूर गंगाराम केदार व प्रदीप तांबे यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. संबंधित बिबट नराला सुरक्षितरित्या ताब्यात घेऊन माणिकडोह येथील बिबट निवारण केंद्रात हलविण्यात आले आहे. दरम्यान, याच परिसरात अवघ्या चार दिवसांपूर्वी सुमारे ६ महिन्यांची बिबट मादी देखील जेरबंद करण्यात आली होती, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. त्यामुळे परिसरात बिबट्यांच्या वावराबाबत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या कारवाईदरम्यान जिल्हा परिषदेचे माजी सदस्य भानुविलास गाढवे यांच्यासह गौरव गाढवे, ओमकार गाढवे, विनायक गाढवे, मच्छिंद्र गाढवे, आत्माराम गाढवे, अनिकेत गाढवे आणि उल्हास गाढवे या स्थानिक शेतकऱ्यांनी वनविभागाला सहकार्य केले.

## ओतूर येथील वाघिरे महाविद्यालयाचा बारावीचा निकाल उत्कृष्ट

ओतूर (स. गांवकरी) : जुन्नर तालुक्यातील ओतूर येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयाचा इयत्ता बारावी परीक्षेचा शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चा निकाल अत्यंत उत्कृष्ट लागला असून, महाविद्यालयाने निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. महाविद्यालयाचा एकूण निकाल ९३.५३ टक्के इतका लागल्याची माहिती प्राचार्य डॉ. आर. एन. शिरसाट, उपप्राचार्य ए. एल. बनसोडे तसेच परीक्षा विभाग प्रमुख एम. पी. गंभीर यांनी दिली. शाखानिहाय निकालात विज्ञान शाखेने ९८.३२ टक्के मिळवत आघाडी घेतली असून, वाणिज्य शाखेचा निकाल ९५.१४ टक्के, कला शाखेचा ८२.१९ टक्के तर व्यावसायिक अभ्यासक्रमाचा निकाल ८१.२५ टक्के लागला आहे. विज्ञान विभागातून कु. तनुश्री जितेंद्र तांबे हिने ८७.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. मेघा महेश गंभीर (८०.३३ टक्के) हिने द्वितीय तर कु. विनायक अभिनंदन डुंबरे (७८.६७ टक्के) याने तृतीय क्रमांक मिळवला. वाणिज्य विभागात अभय बाळासाहेब शेवकर (७८.०० टक्के) प्रथम, दुर्वा भरत नायकोडी (७७.६७ टक्के) द्वितीय तर श्रावणी योगेश हाडवळे (७२.६७ टक्के) तृतीय क्रमांकावर राहिले. कला विभागात निकिता सतीश पगारे (६६ टक्के) प्रथम, साहिल घनश्याम उकिरडे (६२.३३ टक्के) द्वितीय तर कुणाल उत्तम घोडे (६०.५० टक्के) तृतीय क्रमांकावर राहिले. व्यवसाय अभ्यासक्रमात मयूर अतुल कालेकर (५७.१७ टक्के) प्रथम, प्रणव हनुमंत हांडे (५५.१७ टक्के) द्वितीय तर सार्थक मुरलीधर गाढवे (५१.८३ टक्के) तृतीय क्रमांकावर राहिले. या यशाबद्दल पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले आहे. तसेच प्राचार्य, शिक्षक व पालकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या समाधीकडे शासनाचे दुर्लक्ष



खर्डी (स. गांवकरी) : शहापूर तालुक्यातील उंभ्रई येथे स्थित आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या समाधीस्थळाकडे शासन व स्थानिक प्रशासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. विशेषतः २ मे या राघोजी भांगरे यांच्या स्मृतिदिनी देखील एकही जबाबदार अधिकारी अथवा लोकप्रतिनिधी यांनी समाधी स्थळाला भेट दिली नसल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात श्रमजीवी संघटनेने वेळोवेळी संबंधित शासकीय विभागांकडे लेखी पत्रव्यवहार करून समाधीस्थळाची देखभाल, सुशोभीकरण, संरक्षण व आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत सातत्याने मागण्या केल्या आहेत. तसेच या विषयावर संघटनेच्या वतीने सतत पाठपुरावा करण्यात येत असूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. मागील पत्रव्यवहारांचे संदर्भ असूनही प्रशासनाच्या या उदासीनतेमुळे स्वातंत्र्य संग्रामातील या महत्त्वपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या स्मारकाची अवस्था दिवसेंदिवस खालावत चालली आहे. यामुळे स्थानिक नागरिक व सामाजिक संघटनांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. आदिवासी समाजाच्या इतिहासात मोलाचे योगदान असलेल्या राघोजी भांगरे यांच्या स्मृतींचे जतन व संवर्धन करणे ही शासनाची नैतिक व प्रशासकीय जबाबदारी आहे. तरीदेखील संबंधित अधिकाऱ्यांकडून होत असलेले दुर्लक्ष गंभीर प्रश्न निर्माण करणारे आहे. याबाबत तातडीने लक्ष देऊन समाधीस्थळाचे जतन, सुशोभीकरण व आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, तसेच संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा, अशी ठाम मागणी श्रमजीवी संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे. अन्यथा येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

## जास्तीत जास्त 'स्व-गणना' करावी : सय्यद उमर यांचे आवाहन




तामसा (स. गांवकरी) : हदगांव तालुक्यातील नागरिकांनी शासनाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या महत्त्वाकांक्षी गणना मोहिमेत नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी आता प्रशासनाने कंबर कसली आहे. तालुक्यातील प्रत्येक नागरिकाने या प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून आपली आणि आपल्या कुटुंबाची 'स्व-गणना' (Self-Enumeration) प्राधान्याने पूर्ण करावी, असे आवाहन तहसीलदार सय्यद उमर यांनी केले आहे. डिजिटल नोंदणीवर भर तहसील कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत तहसीलदार बोलत होते. यावेळी त्यांनी स्पष्ट केले की, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिक आता स्वतःची माहिती स्वतः ऑनलाइन पद्धतीने नोंदवू शकतात. यामुळे गणनेच्या कामात पारदर्शकता येईल आणि वेळेचीही बचत होईल. सुलभ प्रक्रिया: नागरिक घरी बसून मोबाईल किंवा संगणकाद्वारे माहिती भरू शकतात. वेळेची बचत: प्रगणक घरी येण्याची वाट न पाहता नागरिक सोयीनुसार नोंदणी करू शकतात. गोपनीयता: नागरिकांनी दिलेली माहिती पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय राहील.व काही शंका असल्यास संबंधित तलाठी किंवा ग्रामसेवक यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. तालुक्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी या डिजिटल मोहिमेचा लाभ घेऊन प्रशासनाला सहकार्य करावे, जेणेकरून तालुक्याच्या विकासाचा अचूक आराखडा तयार करण्यास मदत होईल, असेही तहसीलदार सय्यद उमर यांनी शेवटी नमूद केले.

# चंद्रशेखर बावनकुळे यांची घेतली भेट

तामसा : (स. गांवकरी)



हदगाव तालुक्यातील नागरिकाच्या महसूल विभागाच्या अनेक प्रलंबित कामाचा निपटारा करण्याविषयी, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची हदगाव तालुका भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष भागवत देवसरकर यांनी शिष्टमंडळासह भेट घेत निवेदन देत समस्या सोडवण्याची मागणी केली. हदगाव तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा राबवणे,सामाजिक अर्थसहाय्य योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे अर्ज समितीच्या बैठकीचे आयोजन करून लाभ मंजुर करून घ्यावे व शिबीरात मंजुरी आदेशाचे वितरण करावे,मंडळ स्तरावरील सर्व शाळांचा आढावा घेऊन दाखले वाटप न झालेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या तयार करणे,शाळेमध्ये Camp Mode वर विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण अर्ज भरून घेणे. शिबीराच्या दिवशी दाखल्यांचे वाटप करावे, मुख्यमंत्री बळीराजा शेतपांदण योजनेत पाणंद रस्त्यांची प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतला उपलब्ध करुन द्यावे,प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे,७/१२ मधील चुकांसंदर्भात अर्ज स्वीकारणे, आवश्यक कागदपत्रांची तपासणी, त्रुटी सूची देणे व तात्काळ करता येणाऱ्या दुरुस्त्याची नोंद घेणे, डिजिटल ७/१२. ८अ उत्तारे तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावे,उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी अधिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-कीमीलेअर प्रमाणपत्र प्राप्त अर्जाच्या अनुषंगाने प्रमाणपत्र वितरीत लवकर वितरित करणे या मागण्याचे निवेदन देत सर्व प्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश द्यावे अशी मागणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावळकुळे यांच्याकडे केली असता तातडीने अधिकाऱ्यांना निर्देश दिले असल्याची माहिती भागवत देवसरकर यांनी दिली, या शिष्टमंडळात तालुका सरचिटणीस अवधूत कदम, परमेश्वर काळे, देवानंद कदम, राजेश लोमटे, जयदीप पुंड आदी उपस्थित होते. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरामध्ये एक खिडकी व्यवस्था करावी. भागवत देवसरकर समाधान शिबिरामध्ये एक खिडकी प्रणाली राबविणे आवश्यक आहे. यासाठी सर्व महसूल अधिकारी तहसीलदार,नायब तहसीदार,मंडळ अधिकारी,तलाठी एकाच ठिकाणी उपलब्ध राहून नागरिकांना त्वरित सेवा देतील.एकाच खिडकीत सर्व प्रकारचे अर्ज स्विकारणे,प्रक्रिया करणे व तात्काळ निकाली काढणे हा उद्देश या योजनेचा आहे, त्यामुळे केवळ कागदपत्रे समाधान शिबिरे न घेता तालुक्यातील नागरिकांना फायदा झाला पाहिजे.

# जनगणना अधिकारी म्हणून नेमणूकीतील दांडीबहाद्दर शिक्षकांवर गुन्हा दाखल

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहरातील शाळांतील जनगणना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या दांडीबहाद्दर शिक्षकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुंब्रा पोलीस ठाण्यात अदखलपात्र अहवाल भा.न्या.सं. 2023चे कलम 222 प्रमाणे तक्रारदार श्री शिवप्रसाद नागरगोजे, सहाय्यक आयुक्त तथा चार्ज जनगणना अधिकारी दिवा प्रभाग समिती ठाणे महानगरपालिका ठाणे यांच्या वतीने ड्यु ड्रॉप इंग्लिश स्कूल दिवा येथील शिक्षक नामे श्रीमती अनुष्का नाईक, दीपिका पगारे, दिव्या हळदणकर, जयप्रकाश बेन बन्सी, कल्पना महाले, माधुरी गुरव व इतर तसेच ग्लोबल इंग्लिश स्कूल दिवा येथील शिक्षक नामे अनिकेत संजय जाधव, दीक्षा कन्हैया सिंग, संध्या रवी अहिरे, अनिकेत ओम प्रकाश गुप्ता, यश विश्वास भोसटेकर व इतर आणि साउथ इंडियन स्कूल दिवा येथील शिक्षक अरुण कुमार यादव व इतर यांनी 23/04/2026 रोजी पासुन ते अद्याप पावेतो प्रकार यातील तक्रारदार व विरोधक हे शासकिय कर्मचारी असुन, विरोधक कर्तव्यावर अनुउपस्थित असल्याने त्यांच्या विरोधात अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जनगणना 2027 चे अनुशंगाने तक्रारदार यांची चार्ज जनगणना अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली असून यांना जनगणनेसाठी कर्तव्य नेमण्यात आलेले आहे. जनगणना 2027 चे अनुशंगाने नेमलेल्या शिक्षकांना दिनांक 23.04.2026 रोजी पासून प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आलेले आहे. विरोधक यांना जनगणना कर्तव्यासाठी हजर राहणे कायदेशीर दृष्ट्या बांधील असतानाही त्यांनी जनगणना कर्तव्यासाठी अनुपस्थित राहून सहाय्य नाकारले म्हणून त्यांचे विरोधात अदखलपात्र अहवाल भा.ना.सु. सं174(2) (ii) नुसार संबधित कोर्टाकडुन दाद मिळविण्याची समज दिली आहे.

# पूल होण्यासाठी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना साकडे



नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील हंडीनिमगाव त्रिवेणीश्वर देवस्थान समोरील नदीवर पूल होण्यासाठी हंडीनिमगाव येथील तरुण मंडळातील सदस्यांनी सोसायटीचे चेअरमन बाळासाहेब साळुंके व ग्रामपंचायत सदस्य युवा नेते किरण जाधव यांच्या नेतृत्वाखाली एकत्रित येऊन खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना नदीवर पूल होण्यासाठी मागणीद्वारे साकडे घातले. हंडीनिमगाव गावातील त्रिवेणीश्वर मंदिराच्या समोरील नदीवर असलेला भराव घातलेला पूल पावसाळ्यामध्ये अनेक वेळा वाहून जातो,यामुळे जाधव वस्तीकडे जाणाऱ्या लोकांचा तसेच गावातील शेतकरी व लहान मुले शाळकरी मुले अबालवृद्ध यांचा गावाशी संपर्क तुटतो गावातील लोकांना शेतात जाण्यासाठी पूर ओसरे पर्यंत वाट बघावी लागते अशी परिस्थिती व वस्तुस्थिती असल्याने युवकांच्या शिष्टमंडळाने या संदर्भात महाशिवरात्रीच्या दिवशी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना हा प्रश्न कानावर घातला होता त्यानंतर शनिवारी दि.२ मे रोजी शिर्डी येथे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या जनसंपर्क कार्यालयात जाऊन संबंधित पुलाचा प्रस्ताव तयार करण्यात यावे असे निवेदन देण्यात आले.

# त्याग आणि समर्पण रयत सेवकाकडून शिकावे - भगीरथ शिंदे

### गणोरे येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या नवीन इमारत भूमिपूजन सोहळा उत्साहात संपन्न

गणोरे : (स. गांवकरी)



रयतचा सेवक हा नऊ नऊ तास काम करत असतो. पंतप्रधान, राष्ट्रपती यापेक्षा मोठा माणूस शिक्षक असतो. हा रयतसेवकांचा सन्मान आहे. त्याग आणि समर्पण रयतसेवकापासून शिकावे. शिक्षणाला व ज्ञानाला खूप मोठे महत्त्व आहे. हे ज्ञान तळागाळातील आदिवासी, हरिजन, बहुजन गरिबांसाठी मिळणे गरजेचे आहे. हे रयत शिक्षण संस्थेने ओळखले आहे. रयत शिक्षण संस्थेने साडेसहा हजार वर्ग खोल्या ए आय करणार आहे. रयत शिक्षण संस्थेत सर्वच राजकीय पक्षाची जाती-धर्माची लोक काम करत आहे. राजकारण बाजूला ठेवून कर्मवीर भाऊराव पाटील, लक्ष्मीबाई, शाहू महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार घेऊन रयत शिक्षण संस्था काम करत असल्याचे मत रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड भगीरथ शिंदे यांनी व्यक्त केले. ते गणोरे (ता- अकोले ) येथील रयत शिक्षण संस्थेचे छत्रपती शिवाजी विद्यालयातील नूतन इमारतीचे भूमिपूजन सोहळा व माजी विद्यार्थी स्नेह मेळाव्यात बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी न्यायमूर्ती चंद्रकांत दातीर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आण्णासाहेब दिवे यांनी केले.अड.भगिरथ शिंदे यांच्या शुभहस्ते कुदळी मारून नवीन इमारतीचे भुमिपुजन करण्यात आले. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाची प्रास्ताविक मुख्याध्यापक अण्णासाहेब दिवे यांनी केले गणोरे पंचक्रोशीतील विविध स्पर्धा परीक्षेत प्राविण्य मिळवलेल्या गुणवंतांचा व देणगीदारांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अधिकारी नवनाथ बोडके, नामदेव आंबरे, डॉ.अशोक दातीर, अप्पर जिल्हाधिकारी तुकाराम हुळहुळे शिक्षण तज्ञ संदीप वाकचौरे अभियंता सुनिल दातीर, नाशिक जिल्हा परिषदेचे वित्त व लेखा अधिकारी योगेश आंबरे, ह भ प मदन महाराज वर्पे, विजयकुमार आहेर आदींनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले.

व्यासपीठावर रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य मनोज कवडे, न्यायमूर्ती चंद्रकांत दातीर, सचिव विकासराव देशमुख, सहाय्यक विभागीय अधिकारी प्रमोद तोरणे, सहाय्यक विभागीय अधिकारी उत्तर विभाग बाबासाहेब नाईकवाडी, बिल्डिंग सुपरवायझर राम नलगे, चेअरमन बांधकाम समिती प्रकाश निकम, अकोले तालुक्यातील सोसायटीचे अध्यक्ष सुनील दातीर सल्लागार समिती सदस्य अंबादास दातीर, मुख्याध्यापक अण्णासाहेब दिवे, आ आयुक्त प्रदीप आंबरे तंटामुक्ती समिती अध्यक्ष अशोक आहेर, सरपंच संतोष आंबरे,मा. विद्यार्थी संघाचे अध्यक्ष राजेंद्र आंबरे, भाऊसाहेब आंबरे,सोनाली आंबरे, भाऊसाहेब दातीर कृषी तज्ञ संजय वाकचौरे तुषार आंबरे, किरण भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.सूत्रसंचालन प्रा. मंगेश कडलक व गोडे मॅडम यांनी केले.

# रखडलेल्या महामार्गामुळे बाजारपेठेवर परिणाम

**ग्राहकांनी फिरवली पाठ : नेमके घोडे कुठे पेंड खाते हे जामखेड करांना कळायला मार्ग नाही**

जामखेड : (स. गांवकरी)



जामखेड शहराची बाजारपेठ राज्यात कापड, सोने, भुसार, भाजीपाला आठवडे बाजार तसेच जनावरांच्या खरेदी-विक्रीसाठी प्रसिद्ध मानली जाते.त्यामुळे येथे नेहमीच मोठ्या प्रमाणावर ग्राहकांची गर्दी होत असून शहरात लक्षणीय ओआर्थिक उलाढाल होत असते.

मात्र, जामखेड–सौताडा राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला सुरुवात झाल्यानंतर परिस्थितीत मोठा बदल झाला आहे. नियोजित वेळेत आणि योग्य पद्धतीने काम पूर्ण न झाल्यामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली असून सततची वाहतूक कोंडी नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे

बाहेरून येणाऱ्या ग्राहकांचा तासन्तास वेळ वाहतुकीत अडकून जात असल्याने त्यांनी जामखेडकडे पाठ फिरवण्यास सुरुवात केली आहे.रस्त्यावर उडणाऱ्या धुळीमुळे नागरिकांना व व्यापाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. पार्किंगच्या समस्येमुळे वाद वाढत असून काही ठिकाणी त्याचे रूपांतर मारामारीत होत असल्याचे चित्र आहे. याशिवाय, चोरीच्या घटना, दादागिरी, अवैध धंदे आणि टोळक्यांची दहशत यामुळेही बाजारपेठेचे वातावरण बिघडले आहे. या सर्व परिस्थितीमुळे पंचक्रोशीतील तसेच शेजारील तालुक्यांतील ग्राहकांची संख्या मोठ्या प्रमाणात घटली असून त्याचा थेट परिणाम जामखेडच्या बाजारपेठेवर होत आहे. व्यापाऱ्यांमध्येही चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, या गंभीर समस्येकडे प्रशासन, लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांनी तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रखडलेल्या महामार्गाच्या कामामुळे निर्माण झालेल्या या 'आजाररूपी' परिस्थितीतून जामखेडकरांना लवकरात लवकर दिलासा मिळावा, अन्यथा राज्यात प्रसिद्ध असलेली जामखेडची बाजारपेठ उध्वस्त होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जामखेडची बाजारपेठ राज्यभर प्रसिद्ध असताना आज ग्राहकांनी पाठ फिरवणे ही अत्यंत गंभीर बाब आहे.यामागील मुख्य कारण म्हणजे राष्ट्रीय महामार्गाचे रखडलेले काम आणि नगरपरिषद हद्दीतील बेकायदेशीर अतिक्रमण होय.

रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी आणि धुळीमुळे नागरिक व ग्राहक त्रस्त झाले आहेत.याचा थेट परिणाम व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर होत असून आर्थिक नुकसान वाढत आहे.प्रशासनाने तात्काळ अतिक्रमण हटवून महामार्गाचे काम पूर्ण करणे गरजेचे आहे.अन्यथाछ जामखेडची ओळख असलेली ही बाजारपेठ धोक्यात येण्याची शक्यता आहे.

# कष्टकरी कुटुंबियांच्या मुलाने PSI पद गाठले!

नायगा व: (स. गांवकरी)



नायगाव तालुक्यातील आंतरगाव येथील जिद्दी युवक ज्ञानेश्वर शिंदे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करत पोलीस उपनिरीक्षक (PSI) पदावर जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे आंतरगावसह संपूर्ण परिसरात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वत्र त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत ज्ञानेश्वर शिंदे यांनी हे यश मिळवले आहे. वडील बालाजी शिंदे हे अल्पभूधारक शेतकरी असून आई कस्तुराबाई शिंदे या शेतीसोबतच घरकाम सांभाळत मुलाच्या शिक्षणासाठी अहोरात्र झटत होत्या. आर्थिक अडचणींवर मात करत त्यांनी मुलाला उच्च शिक्षण दिले आणि त्याचाच परिपाक म्हणून ज्ञानेश्वर यांनी हे यश संपादन केले. स्पर्धा परीक्षेच्या कठीण प्रवासात शिंदे यांनी जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर अनेक अडथळे पार केले. योग्य नियोजन, कठोर परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या बळावर त्यांनी PSI पद गाठत जिल्ह्यात अव्वल स्थान मिळवले आहे.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त 'माझी आत्मकथा' पुस्तकाचे वाटप

## बारडमध्ये उत्साहात जयंती साजरी; समता सैनिक दलाची वंदना

मुदखेड : (स. गांवकरी)



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बारड येथील ज्ञानदीप नगरमध्ये विविध कार्यक्रमांनी भीम जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने प्रा. संदीपकुमार देशमुख यांच्या संकल्पनेतून शालेय विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकरलिखित 'माझी आत्मकथा' या पुस्तकाचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची व संघर्षाची प्रेरणा मिळाली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध यांच्या पुतळ्यास सामूहिक पुष्प अर्पण करून त्रिवार वंदनाने झाली. त्यानंतर भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. स.पो.नि. दत्तात्रेय मंठाळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजारोहण पार पडले. समता सैनिक दलाच्या वतीने पतसंचलन करून मानवंदना देण्यात आली. यावेळी माजी सरपंच दिलीपराव कोरे, ॲड. कमलेश चौदंते, निलेशराव देशमुख, उत्तमराव लोमटे, प्रतापराव देशमुख, प्रा. संदीपकुमार देशमुख, विजय देशमुख, महेश देशमुख, प्रभाकर आठवले, नरसिंग आठवले, नरहरी आठवले, राहुल आठवले, धोंडीबा आठवले, संजय मुलंगे, विजय देशमुख, पिराजी गाडेकर, अमोल टेकले, संजय सावंत आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भीम जयंती मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र आठवले, उपाध्यक्ष अमोल आठवले, निशांत पाईकराव, बाळासाहेब आठवले व राजरत्न धुतडे यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ॲड. कमलेश चौदंते यांनी डॉ. आंबेडकर यांच्या विचारांची आज अधिक गरज असल्याचे नमूद करत देशात संविधान संपुष्टात येत असल्याची चिंता व्यक्त केली. यानंतर गावातील प्रमुख रस्त्यांवरून ढोल-ताशांच्या गजरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक शांततेत आणि शिस्तीत पार पडण्यासाठी यावेळी समता सैनिक दलाने उल्लेखनीय कामगिरी बजावली.

### विद्यार्थ्यांनी घेतला वाचनाचा संकल्प

डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित 'माझी आत्मकथा' या जीवनचरित्रातून त्यांच्या विचारांचा व संघर्षाचा परिचय व्हावा, या उद्देशाने प्रा. संदीपकुमार देशमुख यांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना पुस्तकांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या पुस्तकाच्या वाचनातून आदर्श विचार समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवण्याचा संकल्प केला.

# थोडक्यात पण महत्वाचे



## बालाजी पाटील थोटवाडीकर यांना सेवानिवृत्तीचा निरोप

मुखेड (स. गांवकरी) : आयुष्याच्या एका महत्त्वाच्या टप्प्यावर जेव्हा कोणी सेवानिवृत्त होत असतो तेव्हा त्याच्या वर्षानुवर्षाच्या मेहनतीला आणि समर्पणाला सलाम करणं खूप गरजेचं असतं निवृत्तीच्या शुभेच्छा म्हणजे आराम करणं असं नसून त्याच्या कारकिर्दीचा सन्मान करणं त्याच्या योगदानाची जाणीव ठेवणं आणि पुढच्या नव्या अध्यायासाठी प्रेरणा देणे हे भाग्य लागतं असते शिक्षक आपल्या आयुष्यातील सर्वांचा महत्त्वाचं कन्ना समजला जातो त्यांनी विद्यार्थ्यांना घडवल शिकवलं आणि योग्य मार्ग दाखवलं हजारो विद्यार्थ्यांचे आयुष्य घडवलं विद्यार्थ्यांना नुसतं शिक्षणच दिल नसून एक चांगले संस्कार सुद्धा दिल आहे एखादा शिक्षक एखाद्या गावामध्ये तीन-चार वर्षे घालवलं विद्यार्थ्यांना शिक्षणाचा दर्जा ज्ञान दिलं चांगले संस्कार दिले त्यांची आठवण मात्र कायम राहणार आहे त्यांची खुर्ची जरी बदलली विचार मात्र मनात कायम असणार आहेत या युक्तीप्रमाणे बापसेटवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा थोटवाडी येथील रहिवासी असलेले बालाजी शंकरराव पाटील, यांना शिक्षण विभाग व गावकऱ्यांच्या वतीने सेवानिवृत्तीचा निरोप देण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मलिकार्जुन पाटील, हे होते तर कार्यक्रमाचे शुभेच्छक म्हणून सर्वांचे लाडके आमदार डॉ. तुषार राठोड, यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती तसेच माजी जिल्हा परिषद अध्यक्ष वैशालीताई चव्हाण, माजी सभापती स्वप्नील चव्हाण, जिल्हा काँग्रेस नेते रामदास पाटील सुमठाणकर, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष राजन देशपांडे, मुखेड बाजार समितीचे माजी उपसभापती व्यंकटराव पाटील चांडोळकर,मा. प्रदेश सचिव भाजपा युवा मोर्चा रामराव मस्कले, गटशिक्षणाधिकारी बि एम पाटील, दिलीप देवकांबळे, बाराहाळी तंटामुक्ती अध्यक्ष हणमंत मामा वाडीकर, भाजपा जिल्हा सचिव चंद्रशेखर पाटील सावळीकर, भाजपा तालुका अध्यक्ष बालाजी पाटील सकनुरकर, सेवानिवृत्त केंद्रप्रमुख पी एस पाटील, बापशेठवाडीचे सरपंच कु. दीपिकाताई मंदेवाड, माजी सरपंच मीनाक्षीताई पाटील, शिक्षण विस्तार अधिकारी बालाजी बनसोडे, उत्तम चव्हाण, केंद्रप्रमुख एस एस करेवाड, आदी मान्यवर उपस्थित होते.

## समाधान शिबिरात अधिकाऱ्यांची दांडी; खोट्या सही प्रकरणाने खळबळ

तामसा (स. गांवकरी) : हादगाव तालुक्यातील तामसा मंडळांतर्गत दिनांक ३० रोजी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिरात प्रशासनातील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. एकूण ३२ विभागांना उपस्थित राहण्याचे आदेश असतानाही केवळ ८ विभागांचे अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहिले, तर तब्बल २४ विभागांचे अधिकारी गैरहजर राहिल्याचे उघड झाले. हे शिबिर तहसीलदार सय्यद उमर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तामसा मंडळ अधिकारी भाग्यश्री कंदकुर्ते आणि ग्राम महसूल अधिकारी दत्ता चेके यांनी नियोजनबद्ध पद्धतीने शिबिराचे आयोजन करून नागरिकांच्या तक्रारी ऐकून त्यांचे निवारण करण्याचा प्रयत्न केला. महसूल, पुरवठा, कृषी, पंचायत समिती, आरोग्य, वीज वितरण, महिला व बालविकास आणि भूमी अभिलेख या विभागांनी उपस्थिती दर्शवली. मात्र उर्वरित विभागांचे अधिकारी अनुपस्थित राहिल्याने नागरिकांना अपेक्षित सेवा मिळण्यात अडचणी निर्माण झाल्या. विशेष बाब म्हणजे, काही अनुपस्थित अधिकाऱ्यांच्या उपस्थिती पत्रकावर खोट्या स्वाक्षऱ्या करण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी होण्याची शक्यता असून, अनुपस्थित राहिलेल्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते. तसेच खोट्या स्वाक्षऱ्या करणाऱ्या संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जिल्हाधिकारी स्तरावरून याबाबत अहवाल मागवला जाण्याची शक्यता आहे. महसूल मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या या महाराजस्व समाधान शिबिराचा उद्देश नागरिकांच्या तक्रारी तत्काळ सोडवणे हा असला तरी, अधिकाऱ्यांच्या निष्क्रियतेमुळे या उपक्रमाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## हनुमान मंदिर व बाळूमामा मंदिरातील दानपेटी फोडून चोरांनी ठोकली धूम

मुखेड (स. गांवकरी) : मौजे सुगाव बु येथील हनुमान मंदिर व बाळूमामा मंदिरातील सतत दानपेटी फोडून आतील पैसे व काही मौल्यवान वस्तू चोरीला जात असल्याचा प्रकार समोर येत आहे हा प्रकार एकदा दोनदा नसून सतत चालू आहे याचा मुख्य सूत्रधार कोण आहे अजून पर्यंत समजलं नाही याचा न्याय निवाडा पोलिसांनी लावावा असं गावकऱ्याच म्हणणं आहे चोराला मशाइ धारजन म्हटल्यासारख होत आहे हा प्रकार बऱ्याच दिवसापासून चाललाय मंदिरातील घंटी असेल किंवा काही वस्तू असतील ते चोरीला जात आहे त्याची खबरदारी पोलिसांनी घ्यावी अशी मागणी सुगाव (बु) येतील नागरिकांनी केली आहे हा प्रकार सतत चालू आहे सुगाव येथील जयशू तांडा फाट्याजवळ रात्रीच्या वेळी काही अज्ञात व्यक्तीने नशा पाणी करून येणाऱ्या जाणाऱ्या दुचाकी वाहनधारकांना आडवून लुटमारी करीत असल्याचे बोलल जात आहे तरी पोलीस प्रशासनाला विनंती आहे की रात्रीच्या वेळी पोलिसांनी रात्रपाळी करून चोरावर आळा बसवावं व त्यांच्यावर कडक व कठोर अशी कार्यवाही करून होणाऱ्या चोरीवर आळा बसावं अशी विनंती गावकर्याकडून केली जात आहे.

## सिडको कार्यालय व मनपाच्या सिडको कार्यालय येथे ध्वजारोहण संपन्न

नवीन नांदेड (स. गांवकरी) : महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या 1 मे शुक्रवार रोजी होणाऱ्या 67 व्या वर्धापन दिनानिमित्त सिडको ऑफिस येथे सकाळी 7 वाजता कपिल राजपूत यांच्या हस्ते तर नावामनपाचा सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे सकाळी 6.45 वाजता सहाय्यक आयुक्त डॉ.मिर्झा बेग यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सिडको नवीन नांदेड येथे स. वि.अधिकारी कपिल राजपूत यांच्या हस्ते ठीक सकाळी 7 वाजता करण्यात आले यावेळी लिपिक संकेत गिरी व कार्यालय कर्मचारी यांच्या सह सुरक्षा रक्षक उपस्थिती होती. नावामनपाचा सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे सहाय्यक आयुक्त डॉ.मिर्झा बेग यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी भाजपा नगरसेवक वैजनाथ देशमुख, कार्यालय अधीक्षक विलास गजभारे,कर निरीक्षक संजय नागापूरकर, वसंत कल्याणकर शादुला खान, नारायण आठवले,व वसुली लिपिक व कार्यालयीन कर्मचारी यांच्या सह पत्रकार, नागरिक व मातृ सेवा आरोग्य केंद्र कर्मचारी अशा वर्कर यांच्यी उपस्थिती होती.

# आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाच्या प्रगत-अद्ययावत ऑटोमोटिव स्टील प्रॉडक्शन लाइनचे जपानच्या राजदूताच्या हस्ते उद्घाटन

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाने (एएम/एनएस इंडिया) आज गुजरातच्या हाजिरा येथील कंपनीच्या प्रमुख प्रकल्पात,भारतातील जपानचे राजदूत सन्माननीय (or राजमान्य राजश्री) श्री. केइची ओनो यांच्या हस्ते प्रगत पिक्लिंग लाइन आणि टँडम कोल्ड मिल (PLTCM) चे उद्घाटन करण्याची घोषणा केली.

प्रति वर्ष 2 दशलक्ष (or 20 लाख) टन्सची क्षमता असलेल्या प्रगत-अद्ययावत PLTCM चे उद्घाटन AM/NS इंडियाच्या ऑटोमेटिव उत्पादन क्षमतेमध्ये महत्वाची भर म्हणून करण्यात आले आहे आणि लवकरच उच्च-प्रतीच्या, कोल्ड-रोल्ड बेस स्टीलच्या उत्पादनासाठी ही सुसज्ज होईल, ज्याचा उपयोग तत्सम प्रकारच्या पहिल्या, तसेच जनक (or मूळ) कंपन्या आर्सेलॉर मित्तल आणि निप्पॉन स्टील द्वारा पेटंटप्राप्त स्टील सोल्यूशन्ससह जागतिक-दर्जाच्या उत्पादनांच्या निर्मितीसाठी केला जाईल. ही नवीन लाइन ऑटोमोटिव्ह उद्योगाच्या वाढत्या गरजांच्या पूर्ततेसाठी ॲडव्हान्स्ड हाय स्ट्रेंथ स्टील (AHSS) च्या उत्पादनात भारताला पूर्णपणे आत्मनिर्भर बनवण्याच्या दिशेने उचललेले एक महत्वाचे पाऊल आहे. भारतातील अत्यंत प्रगत प्रॉडक्शन लाइन्समध्ये , ह्या सुविधेत (or फॅसिलिटीत) जनक (or मूळ) कंपन्यांच्या सखोल नैपुण्यावर आधारित तांत्रिक प्रगत-अद्ययावत प्रक्रिया तंत्रज्ञान, उत्कृष्ट स्वयंचलन (or ऑटोमेशन ) आणि जागतिक मापदंड प्रमाणित गुणवत्ता प्रणाली ह्यांचे संकलन आहे. ही सुविधा (or फॅसिलिटी) ॲडव्हान्स्ड हाय स्ट्रेंथ स्टील (AHSS), गॅल्व्हॅनील्ड (GA), गॅल्व्हनाइज्ड (GI) आणि प्रेस हार्डन्ड स्टील (PHS) ॲप्लिकेशन्ससाठी प्रगत ऑटोमोटिव्ह स्टीलच्या उत्पादनाला पाठबळ पुरवण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे, ज्यामुळे तिला देशातील अन्य मिल्सच्या तुलनेत वरचष्मा लाभतो आणि ती सर्व ऑटोमोटिव्ह कंपन्यांना एंड-टू-एंड सोल्यूशन्स प्रदान करते. ही सोल्यूशन्स टिकाऊपणाच्या जागतिक मानकांची पूर्तता करण्यासाठी, सुधारित कार्यक्षमता आणि कामगिरीसाठी वाहनांचे वजन कमी करण्यास सक्षम बनवण्यासाठी, आणि भारत NCAP (BNCAP) मानकांच्या अनुसार सुरक्षितता वाढवण्यासाठी डिझाइन केलेली आहेत.. ही समर्पित ऑटोमोटिव लाइन आर्सेलॉर मित्तल निप्पॉन स्टील इंडियाच्या डाउनस्ट्रीम क्षमतांना लक्षणीय स्वरूपात मजबूत बनवेल, जागतिक मानकांशी मिळत्याजुळत्या घडवेल आणि 1180 MPa पर्यंत सामर्थ्याच्या पातळ्यांसह AHSS च्या उत्पादनाला पाठबळ पुरवेल.

# मुख्याध्यापक विशाल डोके प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)




श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथील श्री संतश्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेचे मुख्याध्यापक विशाल डोके यांनी नियत वयोमानानुसार शैक्षणिक क्षेत्रातील ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्ती स्वीकारली.

सेवानिवृत्तीनिमित्त महाराष्ट्र दिनी प्रशालेत सहकाऱ्यांच्या वतीने त्यांचा विठ्ठल-रुक्मिणीची प्रतिमा देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

गेल्या चार वर्षांपासून डोके यांनी प्रशालेत पर्यवेक्षक व नंतर मुख्याध्यापक म्हणून कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात प्रशालेचा सर्वांगीण विकास होत प्रगतीचा आलेख उंचावला. कर्तव्यतत्पर व्यक्तिमत्त्व आणि विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. सर्वांना सोबत घेऊन त्यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली. हिंदी विषयातील त्यांचे प्रभुत्व असून ते गाढे अभ्यासक व प्रभावी व्याख्याते म्हणूनही परिचित आहेत.

यावेळी शिक्षक प्रमोद रुपनर, वंदना गायकवाड, मुख्याध्यापक नामदेव डुंबरे तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अनिल वाळुंज यांनी मनोगत व्यक्त करत डोके यांच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेत त्यांच्या भावी आयुष्यास शुभेच्छा दिल्या. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांनीही सेवानिवृत्तीनिमित्त विशेष कार्यक्रम आयोजित केला होता. स्वराली होळकर व काव्या बनकर या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले.

# वडिलांच्या निधनानंतरही प्रिया शिंदेचा जिद्दीने यशाकडे प्रवास



श्रीगोंदा : (स. गांवकरी)

आयुष्यातील मोठ्या दुःखावर मात करत जिद्दीने यश मिळवण्याचा आदर्श श्रीगोंदा येथील शारदा विद्या निकेतनच्या एन. एस. गुळवे ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कु. प्रिया मल्हारी शिंदे हिने घालून दिला आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये सुरू होणाऱ्या बारावी बोर्ड परीक्षेपूर्वीच प्रियाच्या वडिलांचे निधन झाले. या मोठ्या आघातानंतरही न डगमगता ती परीक्षेला सामोरी गेली आणि नुकत्याच जाहीर झालेल्या निकालात कला शाखेत दुसरा क्रमांक पटकावला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतूनही प्रिया हिने आपल्या जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्था अध्यक्ष प्रा. दीपक होनराव यांनी तिचा विशेष सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी श्रीगोंदा तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष तथा प्राचार्य बी. टी. मखरे, कॉलेज विभाग प्रमुख प्रा. कांचनताई कुरुमकर, प्रा. प्राजक्ता होनराव, प्रा. सचिन जगदाळे, प्रा. राम सोनवणे, गणेश लंगोटे आदी मान्यवर उपस्थित होते.

# महाराष्ट्र दिन व कामगार दिन उत्साहात साजरा

अहमदनगर: (स. गांवकरी)

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात, 1 मे, 2026 रोजी महाराष्ट्र दिन व कामगार दिन संस्थेचे जेष्ठ विश्वस्त मा. सितारामजी खिलारी उर्फ अण्णा यांच्या हस्ते ध्वजारोहण करून अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी अण्णांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 1 मे, 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. हा दिवस महाराष्ट्राची गौरवशाली परंपरा, मराठी अस्मिता, हुतात्म्यांचे बलिदान आणि विजयाचा सोहळा आहे. या प्रसंगी अण्णांनी जागतिक कामगार दिन, मराठी राजभाषा दिनाविषयी माहिती दिली व शुभेच्छा दिल्या. तसेच उन्हाची तीव्रता वाढल्यामुळे, विद्यार्थ्यांनी काळजी घेण्याचे आवाहन केले.



**महाराष्ट्र दिन हुतात्म्यांचे बलिदान आणि विजयाचा सोहळा : सिताराम खिलारी पा.**

या कार्यक्रमात संस्थेच्या ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षेत जिल्ह्यात नववा क्रमांक मिळवणारी विद्यार्थिनी कु. वैभवी कटारिया व तेरावा क्रमांक मिळवणारी कु. आराध्या कडुसकर व मार्गदर्शक शिक्षकांचा अण्णांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यालयाचे प्राचार्य श्री. बाळासाहेब खिलारी यांनी आपल्या भाषणातून सांगितले की, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी 106 हुतात्म्यांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. महाराष्ट्र घडविणे ही आपली जबाबदारी आहे. आज जागतिक कामगार दिन असून हा दिवस शेतकरी, मजूर, कष्टकरी, कामगार यांनी आपल्या हक्कासाठी केलेल्या संघर्षाची जाणीव करून देतो. यावेळी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये उन्हात बाहेर न पडता, आपण घरात बसून वेगवेगळे छंद जोपासण्याचे आवाहन केले व सर्वांना महाराष्ट्र दिन जागतिक कामगार दिन व मराठी राजभाषा दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. लहू जाधव व उपाध्यक्ष श्री. अविनाश भालके ही उपस्थित होते. श्री. भालके यांनीही आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. बाबासाहेब जाधव यांनी केले. अध्यक्ष निवड श्री. निलेश जासूद यांनी तर, सूत्रसंचालन श्री. अतुल सैद यांनी केले व आभार पर्यवेक्षिका श्रीम. मनिषा गाडगे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी कला विभागाचे समन्वयक श्री. विजय सोबले, शास्त्र विभागाचे समन्वयक श्री. अशोक गांगड, ज्येष्ठ शिक्षक श्री. मल्हारी वागस्कर, श्री. रविंद्र मते, श्री. नारायण शेळके, श्री. राजेंद्र ढोणे, प्रिया डव्हणे यांचे सह पालक शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आमदार विवेकभैय्या कोल्हे यांच्या स्वागताला उसळला जनसागर

## आमदारकीचा सातबारा जरी माझा असेल पण पोट हिश्यात कार्यकर्त्यांची नावे : विवेकभैय्या कोल्हे

कोपरगाव : (स. गांवकरी)



माजीमंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांचे आशीर्वाद आणि तळागाळातील सर्व मतदार बंधू भगिनी कार्यकर्ते यांची अलौकिक साथ आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांचा विश्वास असे म्हणत युवानते

विवेकभैया कोल्हे यांनी "धन्यवाद देवा भाऊ धन्यवाद" या घोषणेने कोपरगावचा आसमंत दुमदुमून टाकला.सायंकाळी सहा वाजता सुरू झालेली विजयी मिरवणूक अकरा वाजता आटोपली.

ही एक नवी सुरुवात आहे, पक्ष संघटन वाढवून आपल्याला विकासाचे काम करायचे आहे अशा शब्दात युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांनी कार्यकर्त्यांना विश्वास दिला. केवळ तालुक्यापुरते मर्यादित म्हणून ही जबाबदारी पक्षाने दिली नसून मोठे काम संघटनात्मक दृष्टीने देखील युवा शक्तीच्या साथीने करायचे आहे. अत्याधुनिक जीप, उंट, घोडे आणि डोक्यावर घेऊन नाचणारे हजारो युवक कार्यकर्ते, फुले, हार, गुच्छ, सुहासिनींचे ठिकठिकाणी औक्षण, पेढ्यांची रेलचेल, मोठमोठे बॅनर, आकाशात फटाक्यांची बहारदार उडवणूक, डीजेचा दणदणाट, भारतीय जनता पक्षाच्या झेंड्यांची भव्य मोटरसायकल व कार रॅली, संबळ, बँड तडमताशाचा लयबद्ध आवाज, सेल्फी आणि रिल्सचा पाऊस, साथीला देवांचा,श्री साईबाबा तपुभूमी मंदिर येथे आशीर्वाद आणि शहरातील छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्याप्रति विनम्रतेचा आदर असे वर्णन असलेली युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांची विजयी मिरवणूक सर्वांच्याच मनात भरली. विधान परिषदेसाठी उमेदवारी अर्ज दाखल करून कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव थेट मुंबईतून समृद्धी मार्गे स्वागतासाठी आलेल्या युवाशक्तीच्या शेकडो वाहनांच्या ताफ्यात साईबाबा कॉर्नर कोपरगाव येथे विवेकभैय्या कोल्हे शनिवारी सायंकाळी दाखल झाले त्याप्रसंगी विजयी मिरवणुकीचा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे समारोप करताना ते बोलत होते. शहरात त्यांच्या स्वागतासाठी "आता थांबायचं नाही"असा आशय असलेले फलक ठिकठिकाणी लावण्यात आले होते. विवेकभैय्या कोल्हे पुढे म्हणाले की, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपिनदादा कोल्हे माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली येथून पुढचा राजकीय प्रवास सुरू झाला आहे त्यात सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. अतिशय कमी वयात सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखाना या मातृसंस्थेच्या अध्यक्षपदापासून आपली कारकीर्द सुरू झाली आहे. कोपरगावच्या राजकीय प्रवाहात अनेक चढउतार आले, २०२४ च्या निवडणुकीत संयम दाखवला त्याचे हे फळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सर्व मंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण व त्यांचे सर्व पदाधिकारी यांनी दिले.

# डी-मार्टमध्ये मुदतबाह्य केक विक्रीचा धक्कादायक प्रकार

ठाणे : (स. गांवकरी)



ठाणे शहरातील ढोकाळी परिसरातील D Mart मध्ये एक्सपायरी डेट संपलेल्या केकची विक्री होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. Britannia Industries च्या Gobbles ब्रँडचे केक एक्सपायर होऊन 15 दिवस उलटल्यानंतरही स्टोअरमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित केकची एक्सपायरी तारीख 19 एप्रिल 2026 होती. मात्र 2 मे 2026 रोजीदेखील सुमारे 50 हून अधिक पाकिटे विक्रीसाठी रॅकमध्ये ठेवण्यात आली होती. धक्कादायक बाब म्हणजे या उत्पादनांची बिलिंगदेखील सुरू होती. सदर प्रकार तेव्हा उघडकीस आला, जेव्हा ग्राहक मिलिंद जाधव यांनी 30 एप्रिल रोजी हा प्रॉडक्ट खरेदी केला. त्यांनी 2 मेच्या संध्याकाळी केक खाल्ल्यानंतर पोटदुखी व उलट्यांचा त्रास सुरू झाला. त्यानंतर प्रॉडक्टवरील तारीख तपासली असता तो केक 19 एप्रिललाच एक्सपायर झाल्याचे दिसून आले. त्यानंतर पुन्हा डी-मार्टमध्ये जाऊन पाहणी केली असता, एक्सपायरी डेटचे केक मोठ्या प्रमाणात स्टॉकमध्ये ठेवून विक्री सुरू असल्याचे दिसून आले. माहिती मिळताच ठाणे भाजपचे अखिलेश पाल, राकेश मिश्रा यांनी घटनास्थळी जाऊन व्हिडिओ व फोटोद्वारे पुरावे गोळा केले आणि हा प्रकार उघड केला.

# महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित कार्यक्रमात एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आपल्या भाषणात त्यांनी महाराष्ट्र ही संत, समाजसुधारक आणि वीरांची भूमी असल्याचे अधोरेखित केले. समाजसुधारकांच्या त्यागातून महाराष्ट्र समृद्ध व संपन्न झाला असून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच संयुक्त महाराष्ट्र चळवळीत योगदान देणाऱ्या महान व्यक्तींचे स्मरण करून त्यांनी महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.



कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, आयक्यूएसी समन्वयक डॉ. राहुल गायकवाड, एनसीसी विभागप्रमुख डॉ. किरण ढवळे, शारीरिक शिक्षण संचालिका प्रा. कल्पना बागुल, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, क्रीडा शिक्षक प्रा. संजय डफळ, डॉ. राजेंद्र ठाकरे, डॉ. राजाराम कानडे, अधीक्षक बाळासाहेब राऊत यांच्यासह सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप दरेकर यांनी केले.

# बुद्ध पौर्णिमा निमित्त मान्यवरांचा सत्कार

**शालेय साहित्याचे वाटप**

श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)



श्रीगोंदा तालुक्यातील एरंडोली गावात बुद्ध पौर्णिमेच्या निमित्ताने आयोजित सामाजिक उपक्रमात विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा भारतीय संविधान भेट देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमात प्रशांत चव्हाण यांनी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. शालेय साहित्य वाटपासाठी मच्छिंद्र पाडळे, राजेंद्र शिंदे, जालिंदर पाडळे, गौतम शिंदे, तनुजा पाडळे, संगीता सोनवणे आणि पप्पू शिंदे यांचे विशेष योगदान लाभले. यावेळी सरपंच सौ. मनोरमा इथापे यांनी स्वनिधीतून सार्वजनिक चौकात फरशी बसविणे, बोधिवृक्ष (पिंपळ) कट्टा बांधकाम तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीची भेट दिली. वाल्मिक शिंदे यांनी एलईडी लाईट भेट देऊन उपक्रमात सहभाग नोंदविला. कार्यक्रमात एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण आकाश पवार, महाराष्ट्र पोलीस दलातील संजना शेंडगे, लक्षवेध परीक्षेत राज्यात चौथा क्रमांक मिळविणारे प्रीतम जौजाळ तसेच सामाजिक कार्यकर्ते मंगेश घोडके यांचा भारतीय संविधान देऊन गौरव करण्यात आला. आदर्श बौद्धाचार्य अरुण पठारे यांचाही सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास सरपंच मनोरमा इथापे, उपसरपंच पूनम शिंदे, प्रशांत चव्हाण, विकास इथापे, राजेंद्र शेंडगे, सागर बनकर, प्रकाश इथापे, मयूर पारखे, भीमराव दिवटे, महेश पवार, बाळासाहेब आल्हाट, प्रकाश काळोखे, मल्हारी शिंदे, दादा शिंदे, राजू शिंदे, आदित्य शिंदे, विकास शिंदे, सुरेश शिंदे, विजय शिंदे, रोहित कोबळे, शामराव शिंदे, शुभम शिंदे, ओंकार शिंदे, अतुल शेंडगे, कुणाल शिंदे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पंचशील मित्र मंडळ, माता रमाई महिला बचत गट व माता भिमाई महिला बचत गट, एरंडोली यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पप्पू शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन विकास शिंदे यांनी मानले.